संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जानेवारी २०२६

ई - मासिक

# विद्यावार्ता

## प्रजासत्ताक दिन

### २६ जानेवारी





विशेषांक

# विद्यावार्ता

ई - मासिक

# अनुक्रमणिका



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in


- विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त कुलगुरुंचे हस्ते ध्वजारोहण संपन्न १
- अमरावती विद्यापीठ महाराष्ट्रातून उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्काराने सन्मानित ३
- विद्यापीठात ऋणानुबंध भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन ४
- विद्यापीठाच्या संशोधकांना मिळाले दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट ६
- एआय. आधारित ह्युमन रिसोर्स प्लॅनिंग सिस्टीमसाठी डॉ. रत्नशील खोब्रागडे यांना पेटेन्ट } ७
- विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरतर्फे स्टार्टअपमध्ये मोठी गुंतवणूक } ७
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेहस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार ८
- विद्यापीठाचा विद्यार्थी अजिंक्य पोटे याने पश्चिम विभागीय अन्वेषण स्पर्धेत पटकाविला प्रथम क्रमांक ९
- अमरावती विद्यापीठाच्या मुलांच्या फुटबॉल चमुची अखिल भारतीय स्तरावर दमदार कामगिरी १०
- विद्यापीठात स्टार्टअप एक्सपो-२०२६ चे उद्घाटन ११
- राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन परेडमध्ये विद्यापीठाचे रासेयो स्वयंसेवक सहभागी होणार १५
- विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत एम.बी.ए.विभागाच्या विद्यार्थीनींना कलरकोट पुरस्कार } १६
- विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत } १६
- विद्यार्थी संघटनांशी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी साधला संवाद १७
- बुलडाणा येथिल मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळेला राज्यस्तरीय अश्वमेध क्रीडा महोत्सवात रजत पदक १८
- विद्यापीठात आहार प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद १९
- विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची मतिमंद मुलांच्या शाळेला भेट २१
- विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात विविध उपक्रम व माजी विद्यार्थी मेळाव संपन्न २२
- संकल्प दौडमध्ये शेकडो शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग २३
- विद्यापीठात राजमाता जिजाऊ जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न २४
- विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी २७
- समाजशास्त्र विभागात निसर्ग असमातोल व पर्यावरण संवर्धन विषयावर व्याख्यान संपन्न २८
- विद्यापीठात राष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा संमेलन उत्साहात २९
- विद्यापीठात डॉ. योगेश ब्राम्हणकर यांच्याशी संवाद कार्यक्रम संपन्न ३१
- राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होणाऱ्या चमूंना कार्यशाळेतून मार्गदर्शन ३३
- विद्यापीठात ऑपरेशन सिंदुर आणि आत्मनिर्भर भारत विषयावर व्याख्यान संपन्न ३४
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांचा सत्कार ३६
- विद्यापीठात मराठी भाषा पंधरवडा निमित्याने विद्यार्थ्यांचे कविसंमेलन व चर्चासत्र संपन्न ३७
- विद्यापीठात मी ज्यातिराव फुले बोलतोय एकपात्री नाटकाचे सादरीकरण ४०
- विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरव्दारा सेमिनार स्पर्धा संपन्न ४१
- विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा विषयावर व्याख्यान संपन्न ४२
- विद्यापीठात सेवानिवृत्तप्रसंगी कर्मचाऱ्यांचा सत्कार ४४
- खेल विशेष ४६
- जयंती विशेष ४९
- बातमी कात्रणे ५३




# शिक्षणातून सामाजिक परिवर्तन शक्य - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
# विद्यापीठात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा
# कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण



ध्वजारोहणानंतर मार्गदर्शन करतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

शिक्षण हीच ती शक्ती आहे, जी समाजात परिवर्तन घडवू शकते. विद्यापीठ हे केवळ पदव्या देणारे केंद्र नसून जबाबदार नागरिक, संशोधक, उद्योजक आणि नेतृत्व घडविणारे एक सशक्त व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, त्यानिमित्त मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजस्तंभस्थळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व श्री राजेश पिददी उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, २६ जानेवारी १९५० हा दिवस भारताच्या इतिहासातील एक सुवर्णाक्षरी दिवस आहे. या दिवशी आपण स्वतःचे संविधान स्वीकारले आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक म्हणून जगाच्या पटलावर उभा राहिला. हे संविधान केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून, ते समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे प्रतीक आहे. गेल्या काही वर्षांत आपल्या विद्यापीठाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा, संशोधन उपक्रम, स्टार्टअप्स आणि आंतरराष्ट्रीय संधींमध्ये मिळवलेले यश हे आपल्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे.

आजचा काळ हा केवळ ज्ञानाचा नाही, तर कौशल्य, नवकल्पना आणि नैतिक मूल्यांचा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुविध संधी, प्रत्यक्ष अनुभव आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा आपला प्रयत्न सुरू आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात कृत्रिम बुध्दिमत्ता, डेटा सायन्स, बायोटेक्नॉलॉजी आणि उद्योजकता या क्षेत्रांत भारत जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे. या प्रवासात आपल्या विद्यापीठातील तरुणाईने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठात नवउद्योजकता रुजविण्यासाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्यात आणि लवकरच स्टार्टअप एक्स्पो २०२६ चे आयोजन करण्यात येणार आहे. आपले विद्यापीठ हे केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता आता इन्नोव्हेशन आणि उद्योजकतेचे केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे, याचा कुलगुरू म्हणून सार्थ अभिमान वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



कुलगुरू पुढे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करीत असतांना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, यासाठी विद्यापीठाने इंटर्नशीप पोर्टल सुरु केले आहे. तसेच ए.ई.डी.पी. अंतर्गत बी.एस्सी. डाटा सायन्य ॲन्ड ॲनॅलिटीक्स आणि बी.कॉम. रिटेल मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले असून ८ उद्योगांशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. आगामी काळात संलग्नित महाविद्यालयांमध्ये हे अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे. जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करण्यासाठी विद्यापीठाने आफ्रिकन आणि इतर देशांतील विद्यापीठांशी संपर्क साधला असून १२ विद्यापीठांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. तसेच इतर संस्थांशी सुद्धा आपण सामंजस्य करार केला असल्याची माहिती कुलगुरूंनी यावेळी दिली.

यावेळी कुलगुरूंनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. प्रजासत्ताक दिनाला विविध प्राधिकारिणींचे सन्माननीय सदस्य, सर्व संवैधानिक अधिकारी, विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# आव्हान शिबीरामध्ये महाराष्ट्रातून अमरावती विद्यापीठ उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्काराने सन्मानित




डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे नुकत्याच झालेल्या आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबीरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी आपल्या विद्यापीठाने उत्कृष्ट विद्यापीठ फिरता चषक पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल सहभागी सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व चमू व्यवस्थापकांचे भरभरुन कौतूक व अभिनंदन करुन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने प्राप्त केलेले घवघवीत यश विद्यापीठाकरिता अभिमान व गौरवास्पद असून राज्यस्तरावर विद्यापीठाचे नाव उंचावणारी असल्याचे गौरवोद्गार काढले.

या शिबीरामध्ये सहभागी सर्व स्वयंसेवक व चमू व्यवस्थापक यांना लिफ्टींग ॲन्ड मव्हिंग, स्ट्रेचर्स प्रकार, बी,एल,एस. उपचार पध्दती, सी.पी.आर. पध्दती, सर्पदंश, ऊन, वादळ व अतीवृष्टी पासून घ्यावयाची दक्षता, रॅपलींग, वॉटर रेस्क्यू, आग व पूर नियंत्रण अशा आपत्ती व्यवस्थापनाचे विविध प्रात्यक्षिकाद्वारे एन.डी.आर.एफ.च्या तज्ज्ञांकडून धडे देण्यात आले. विद्यार्थी तसेच चमू व्यवस्थापकांची प्रशिक्षणानंतर लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. परीक्षेच्या माध्यमातून एक उत्कृष्ट विद्यापीठ, एक उत्कृष्ट जिल्हा, दोन उत्कृष्ट चमू व्यवस्थापक, चार उत्कृष्ट स्वयंसेवक, एक उत्कृष्ट मिरवणूक असे ९ पुरस्कार प्रदान करण्यात येतात. लेखी व प्रात्याक्षिक परिक्षेमध्ये सहभागी झालेल्या २४ विद्यापीठांपैकी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उत्कृष्ट विद्यापीठ फिरता चषक पुरस्कार पटकाविला. तर सहभागी ७४ चमू व्यवस्थापकांपैकी जी.एस. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगांवच्या डॉ. निता बोचे यांना उत्कृष्ट चमू व्यवस्थापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महामहीम राज्यपाल तथा कुलपती यांचे कार्यालयाचे निर्देशानुसार आव्हान चॅन्सलर्स ब्रिगेड या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येत असते. गतवर्षी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे १७ ते २४ जानेवारी, २०२६ दरम्यान सदर शिबीर संपन्न झाले. सदर शिबीरामध्ये महाराष्ट्रातील २४ विद्यापीठांमधून ११२२ स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांनी भाग घेतला. त्यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित पाचही जिल्ह्यांमधील १२५ रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. चमू व्यवस्थापक म्हणून विनायक विज्ञान महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वरचे डॉ. दशरथ काळे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. शुभम राठोड, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, बाभुळगांवच्या डॉ. ज्योती शेगोकार, जी.एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवच्या डॉ. निता बोचे, सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळचे डॉ. विक्रात जाधव, अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळचे प्रो. शशिकांत राठोड, इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या डॉ. प्राची बोंडे, किसनलाल नथमल महाविद्यालय, कारंजा लाडचे डॉ. सुनिल राठोड, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिमच्या डॉ. वर्षा इंगळे सहभागी झाले होते. राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाचे दोन पुरस्कार मिळिवल्याबद्दल स्वयंसेवक व चमू व्यवस्थापकांचे सर्व स्तरावरुन अभिनंदन होत आहे. प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू यांनी सर्वांचे भरभरुन कौतूक करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आम्हाला घडविण्यामध्ये अमरावती विद्यापीठाचे मोठे योगदान - डॉ. सुशील खोजरे
## विद्यापीठात "ऋणानुबंध" भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन



डॉ. सुशील खोजरे यांचा सन्मान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर

पश्चिम विदर्भासारख्या मागास भागात विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाने आम्हा सर्व माजी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे कार्य करुन मोठे केले आणि त्यामुळेच आम्ही देशातच नव्हे, तर जगातल्या नामांकित संस्थांमध्ये मोठ्या पदांवर कार्यरत असल्याचा अभिमान वाटत असल्याचे मत फिडेलिटी इन्व्हेसमेंट, नॉर्थ कॅरोलिना, अमेरिका येथील वरीष्ठ व्यवस्थापक डॉ. सुशील खोजरे यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्यावतीने ऋणानुबंध जोपासण्यासाठी भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, अल्युमिनी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत गावंडे, उपाध्यक्ष डॉ. स्वाती शेरेकर, माजी प्र–कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार, यांचेसह विविध क्षेत्रात मोठ्या पदांवर कार्यरत माजी विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. खोजरे पुढे म्हणाले, आयोजित माजी विद्यार्थी मेळावा हा खरोखरच ऋणानुबंध आहे. १९९८ ला विद्यापीठातून एम.सी.ए. पूर्ण केल्यानंतर आम्ही पहिल्या बॅचचे पाच विद्यार्थी अमेरिकेला गेलो आणि त्याठिकाणी नोकरीला लागलो. उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने त्यांना जे ज्ञानार्जन केले, शैक्षणिकदृष्ट्या सक्षम केले, शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले, त्यामुळेच सर्व माजी विद्यार्थी यशस्वी मार्गावर पोहचू शकले. त्यांना आलेले अनुभव याठिकाणी त्यांनी सांगितले आहेत. विद्यापीठाने यानिमित्ताने एक चांगले व्यासपीठ आम्हा सर्वांना उपलब्ध करुन दिले, त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

ते पुढे म्हणाले, आज ए.आय. मुळे जॉब जातो, हे म्हणणे चुकीचे आहे. ए.आय. मुळे कार्यक्षमता वाढली असून प्रत्येक कार्य गतिमानतेने करता येते. प्रत्येक क्षेत्रात ए.आय. चा वापर होत असून येणारा काळ हा ए.आय. चाच आहे, हे युवकांनी लक्षात घ्यावे. तीन हजार कर्मचारी असलेल्या कंपनीमध्ये मी वरीष्ठ व्यवस्थापक म्हणून कार्यरत असल्यामुळे तुम्हाला सांगतो की, आमच्या कंपनीमध्ये ए.आय. मुळे एकाचाही रोजगार गेलेला नाही. त्यामुळे ए.आय. ची भिती न बाळगता सातत्यपूर्ण प्रयत्न करावे, असेही ते यावेळी म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, सर्व माजी विद्यार्थी हे विद्यापीठाचे रत्न आहेत. सहाशेच्या वर माजी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून मोठ्या संख्येने याठिकाणी उपस्थित आहेत. माजी विद्यार्थ्यांशी भावनिक व आत्मिक नाते असल्यामुळे आम्ही ऋणानुबंध ही थीम या कार्यक्रमाकरीता ठेवली. आमचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात मोठमोठ्या पदांवर कार्यरत असल्याचा आम्हाला अभिमान आहे. सर्वच क्षेत्रात आज विद्यापीठाचे नाव आदराने घेतल्या जाते, याचा आम्हाला गौरव वाटतो.




मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्रॅक्टीकल बेसला व ॲनॅलिटीकल अप्रोचला अधिक भर दिला असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यात इंटर्नशीप, ऑन द जॉब ट्रेनिंग अनिवार्य करण्यात आला आहे. यासाठी तसेच प्लेसमेंट याकरीता माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांना संधी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी आम्ही आजी आणि माजी विद्यार्थ्यांचा संवाद आजच्या कार्यक्रमानिमित्ताने ठेवला आणि त्यातून विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल. पाच विद्यार्थ्यांची मेंटॉरशीप प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, असे आवाहन करुन दरवर्षी हा मेळावा आयोजित होणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठातील अल्प मनुष्यबळ लक्षात घेता आणि विद्यापीठाची आर्थिक बाजू लक्षात घेता आर्थिक सहाय्य देण्याबाबत माजी विद्यार्थ्यांनी विचार करावा, असेही कुलगुरू याप्रसंगी म्हणाले.

माजी विद्यार्थ्यांचे मनोगत

माजी विद्यार्थी श्रीमती शितल राठोड, श्री संजय कराड, डॉ. प्रशांत गवई, श्री प्रवीण वानखडे, डॉ. दिलीप कापडे, डॉ. निलेश मनवार, डॉ. संतोष चव्हाण हे मोठ्या पदांवर कार्यरत असून विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आहे. विद्यापीठामुळे आम्ही घडलो, आम्हाला दिशा मिळाली आणि म्हणूनच आम्ही आज मोठ्या पदावर कार्यरत असून समाजाला सेवा देत आहोत, याचा आम्हाला अभिमान वाटत असल्याची भावना या माजी विद्यार्थ्यांनी मनोगतातून व्यक्त केली.

**यु.डी.आर.एफ. विभागाचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे दरवर्षी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागाचे युनिव्हर्सिटी डिपार्टमेन्ट रँकींग फ्रेमवर्क केल्या जाते. यावर्षी यु.डी.आर.एफ. मध्ये प्रथम क्रमांक भौतिकशास्त्र विभाग, द्वितीय संगणकशास्त्र विभाग व तृतीय बायोटेक्नॉलॉजी विभागाने मिळिवला. या उच्चतम कामगिरीबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी त्या विभागाचे विभागप्रमुख व शिक्षकांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार केला.




मार्गदर्शन करतांना डॉ. सुशील खोजरे

यावेळी माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने तसेच महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने मेळाव्याची सुरुवात झाली. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुस्तक देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. प्रशांत गावंडे व डॉ. स्वाती शेरेकर यांनी प्रास्ताविकतेतून माजी विद्यार्थी मेळाव्यामागील भूमिका विषद केली. श्री आनंद यादव यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते ससन्मान सत्कार करण्यात आला. संचालन कु. मेघा कोटक यांनी, तर आभार श्री अक्षय बांगर यांनी मानले.

माजी विद्यार्थी कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, विविध प्राधिकारिणींचे सदस्य, माजी विद्यार्थी तसेच विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या संशोधकांना मिळाले दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट
## संशोधकांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान
## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याकडून अभिनंदन


डॉ. प्रशांत ठाकरे


कु. पुजा मांडवीय


डॉ. निरज घनवटे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या तीन संशोधकांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट प्राप्त करुन आंतराष्ट्रीय स्तरावर अमरावती विद्यापीठाचा बहुमान वाढविला आहे. प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे व संशोधक विद्यार्थीनी कु. पुजा मांडवीय यांनी 'ए किट फॉर रॅपिड डिटेक्शन ऑफ मिनिमम इनहिबीटरी कन्सन्स्ट्रेशन ऑफ अॅन्टीबायोटिक्स अगेन्स्ट सिलेक्टेड बॅक्टेरियल स्पेशिस' या विषयावर संशोधन केले आहे. विशिष्ट जीवाणूंविरुद्ध प्रतिजैविकांची परिणामकारकता तपासण्यासाठी लागणारा वेळ या किटमुळे कमी होणार आहे. एवढेच नाही, तर आरोग्य क्षेत्रात अचूक उपचारांसाठी हे संशोधन अत्यंत मोलाचे ठरणार आहे.

विशेष म्हणजे डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. नीरज घनवटे यांचे हे तिसरे पेटेन्ट आहे. कोरोना काळात या संशोधकांनी अमरावती जिल्ह्यात 'मॉलिक्युलर डायग्नोसिस लॅब' स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जवळपास ५ लाखांहून अधिक कोविड चाचण्या करून त्यांनी जिल्हाच्या आरोग्य व्यवस्थेला मोठा हातभार लावला आहे. हैदराबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सुध्दा त्यांच्या या संशोधनाचे कौतुक करुन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विविध विभागप्रमुखांनी या संशोधक टीमचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे विद्यापीठाच्या संशोधन कार्याची आता जागतिक स्तरावर दखल घेतली जात असल्याचे देखील सिध्द झाले आहे.

# ए.आय. आधारित ह्युमन रिसोर्स प्लॅनिंग सिस्टीमसाठी डॉ. रत्नशील खोब्रागडे यांना पेटेन्ट



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. रत्नशील खोब्रागडे यांना कृत्रिम बुध्दीमत्ता आधारित ह्युमन रिसोर्स प्लॅनिंग सिस्टीम फॉर ऑर्गनायझेशनल परफॉर्मन्स या अभिनव प्रणालीस भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. या डिझाईनची नोंदणी दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजी करण्यात आली आणि डिझाईन नियम २००१ अंतर्गत मंजूर करण्यात आली आहे. सदर डिझाईन वर्ग १४–०२ मध्ये नोंदणीकृत करण्यात आली आहे.

या संशोधनात्मक आणि नवोन्मेषी प्रणालीचे संशोधक म्हणून डॉ. रत्नशील खोब्रागडे यांच्यासह डॉ. महेंद्र मकेसर, डॉ. शिखा मक्कर व सौ. शीतल गाडेकर, डॉ. पुंगोडी सेन्थिल कुमार, सौ. दिव्या गर्ग, सौ. दीक्षा गर्ग आणि सौ. अंकिता शेंडे यांची नावे नोंदविण्यात आली आहेत. ही एआय आधारित प्रणाली संस्थेतील मानव संसाधन व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, अचूक आणि परिणामकारक करण्यासाठी उपयुक्त ठरणार असून कर्मचारी कार्यक्षमता, नियोजन, निर्णय प्रक्रिया आणि संस्थात्मक कामगिरी सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यामुळे शैक्षणिक, औद्योगिक आणि प्रशासकीय क्षेत्रात या प्रणालीचा व्यापक वापर होऊ शकेल. हे यश संशोधन, नवोन्मेष आणि बौद्धिक संपदा क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मो. अतीक यांनी अभिनंदन केले आहे.

## विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरतर्फे स्टार्टअपमध्ये मोठी गुंतवणूक रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनकडून ७ स्टार्टअप्सला ५२ लाखांचा सीड फंड

केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत नुकत्याच पार पडलेल्या निवड प्रक्रियेमध्ये ७ स्टार्टअप्सची अंतिम निवड करण्यात आली. या स्टार्टअप्सना एकूण ५२ लाख रुपयांचा सीड फंड प्रदान करण्यात येत आहे. या आर्थिक सहाय्यामुळे नवउद्योजकांना उद्योगउभारणी, संशोधन विकास, उत्पादन सुधारणा आणि व्यवसाय विस्तारासाठी भक्कम आधार मिळणार असून, रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत स्थापन करण्यात आलेली रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन ही एक स्वतंत्र सेक्शन ८ कंपनी असून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे मार्गदर्शन आणि प्रा. स्वाती शेरेकर यांच्या देखरेखीखाली सदर इन्क्युबेशन सेंटर अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरला स्टार्टअप इकोसिस्टमच्या बळकटीकरणासाठी महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीकडून ५ कोटी रुपये, डीएसटी आय–टीबीआय कडून ५ कोटी रुपये आणि स्टार्टअप इंडिया सीड फंडकडून २.६२ कोटी रुपये असा निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या माध्यमातून नवउद्योजकांना तांत्रिक, आर्थिक आणि धोरणात्मक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी अंतर्गत स्टार्टअप्सना सीड फंडिंग देण्यासाठी कोहॉर्ट–१ व २ चे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार पात्र ठरलेल्या स्टार्टअप्सची निवड करुन त्यांना भांडवल सहाय्य पुरविण्यात येत आहे. याशिवाय इन्क्युबेशन सेंटर केवळ मार्गदर्शन व संशोधन सुविधा पुरविण्यापुरते मर्यादित न ठेवता उद्योजकतेला आवश्यक तांत्रिक मदत, मार्गदर्शन, उद्योग क्षेत्राशी जोडणी आणि आर्थिक पाठबळ पुरवून स्टार्टअप इकोसिस्टम बळकट करण्याचे महत्वाचे कार्य करीत आहे. विद्यापीठाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थी, नवउद्योजकांमध्ये नवकल्पनांना नवी दिशा मिळत असून प्रदेशातील उद्योगविकासाला नवी ऊर्जा मिळत आहे.

# राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेत विद्यापीठाच्या रासेयो चमुची उत्कृष्ट कामगिरी
# कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेहस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्षव्दारा राज्यस्तरीय उत्कर्ष – सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूने उत्कृष्ट कामगिरी करीत संकल्पना नृत्य, समुहगान व उत्कृष्ट कार्य भित्तीचित्र अहवाल या कलाप्रकारामध्ये तीन पारितोषिके प्राप्त केली आहेत. विद्यापीठाच्या चमूने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व चमू व व्यवस्थापकांचा सत्कार केला.

सदर महोत्सव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे नुकताच पार पडला. या महोत्सवामध्ये महाराष्ट्रभरातील २२ विद्यापीठांमधून ३०४ स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. त्यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा गजानन पळसकर, जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूरचा सार्थक गावंडे, श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जीचा अभिषेक धर्मे, सिताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा हर्षल गवई, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकालचा अभिषेक कातव, जिजामाता महाविद्यालय, बुलडाणाचा संकेत बागडे, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळचा तुषार उके, आर.ए. कॉलेज वाशिमचा महेश राठोड व ऋषिकेश कोंडाणे, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट बडनेराची कु. आर्या जामोदकर, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची कु. जान्हवी शेटे, श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जीची कु. तृप्ती खरात, श्री. आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. यशिका प्रांजळे, पायल भगत, विज्ञान महाविद्यालय, मलकापूरची कु. वृषाली गायकवाड, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणीची कु. ऋतुजा रामगीरवार, बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसदची कु. राजेश्वरी गजरे, ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची कु. नियती काळे असे १८ स्वयंसेवक, तर चमू व्यवस्थापक म्हणून जिजामाता महाविद्यालय, बुलडाणाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन लोहटे सहभागी झाले होते.सदर स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या रासेयो स्वयसेवकांनी आठ सामाजिक व सांस्कृतिक कलाप्रकारांपैकी संकल्पना नृत्य, समूहगान व उत्कृष्ट कार्य भित्तीचित्र अहवाल या कलाप्रकारामध्ये तीन पारितोषिके प्राप्त केली आहेत.

कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व स्वयसेवकांचा सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू यांनीही सर्वांचे भरभरुन कौतूक करुन शुभेच्छा दिल्या.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी अजिंक्य पोटे यांनी पश्चिम विभागीय अन्वेषण स्पर्धेत पटकाविला प्रथम क्रमांक




अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली अंतर्गत पश्चिम विभागीय संशोधन महोत्सव 'अन्वेषण–२०२६' स्पर्धा सरदार पटेल विद्यापीठ, आनंद, गुजरात येथे नुकतीच संपन्न झाली. या संशोधन महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे सहा संशोधक विद्यार्थ्यांची चमू सहभागी झाली होती. पश्चिम विभागांतर्गत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, गोवा, छत्तीसगड व झारखंड या राज्यांमधील विविध विद्यापीठांमधून स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत श्री. अजिंक्य पोटे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त करून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्याकरीता विद्यापीठाच्या आविष्कार चमूमधील उत्कृष्ट सहा प्रकल्पांची निवड करण्यात आली होती. सदर निवड करण्यासाठी मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांचे नेतृत्वात नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ अजय लाड, डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. मनिषा कोडापे यांच्या समितीतर्फे चमूची निवड करण्यात आली होती. निवड झालेल्या सहा प्रकल्पांत विज्ञान गटात विश्वानंद कैलास इधोळे, अभियांत्रिकी व तांत्रिक गटात सय्यद गाउस इब्राहिम, आरोग्य विज्ञान गटात कु. रेणुका सुभाष येंडे, कृषी विज्ञान गटात अजिंक्य कैलास पोटे, समाज विज्ञान गटात संकल्प शैलेन्द्र कोरडे, तर आंतरशाखा गटात राजकुमार गोवर्धनदास जिवताणी यांचा समावेश असलेली चमू या महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नेतृत्व करण्यासाठी सहभागी झाले होते.

अन्वेषण पश्चिम विभाग संशोधन महोत्सवात श्री. अजिंक्य पोटे यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. या स्पर्धेतील कृषी विज्ञान (ॲग्रिकल्चरल सायन्सेस) गटात त्यांनी उत्कृष्ट संशोधन सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या संशोधन प्रकल्पाचे परीक्षक समितीने यावेळी विशेष कौतुक केले. राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा येथील पीएच.डी. संशोधक असलेले श्री. अजिंक्य पोटे यांनी पश्चिम विभाग अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नाव उज्ज्वल केले आहे.

श्री अजिंक्य पोटे यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आविष्कार सेलेच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्यात. या स्पर्धेतील यशामुळे श्री. अजिंक्य पोटे यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'अन्वेषण २०२६' स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर स्पर्धा शूलिनी विद्यापीठ, सोलन (हिमाचल प्रदेश) येथे आयोजित करण्यात येणार असून श्री. अजिंक्य पोटे दि. २४ व २५ फेब्रावारी, २०२६ रोजी या स्पर्धेत सहभागी होऊन विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहेत.



# अमरावती विद्यापीठाच्या मुलांच्या फुटबॉल चमुची अखिल भारतीय स्तरावर दमदार कामगिरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची फुटबॉल (मुले) चमू पारुल विद्यापीठ, वडोदरा (गुजरात) येथे दिनांक ०५ ते ११ जानेवारी, २०२६ या कालावधित संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूंने आपल्या खेळांचे उत्कृष्टप्रदर्शन करुन प्रथम स्थान प्राप्त करून चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता पात्र ठरली होती.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फुटबॉल मुले स्पर्धा कालिकत विद्यापीठ, कालिकत येथे दिनांक ३० जानेवारी ते ०९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधित संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करुन अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत ०८ वे स्थान प्राप्त करुन खेलो इंडिया स्पर्धेकरीता पात्र ठरली.

फुटबॉल (मुले) चमू:

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची फुटबॉल (मुले) चमू पारुल विद्यापीठ, वडोदरा (गुजरात) येथे दिनांक ०५ ते ११ जानेवारी, २०२६ या कालावधित संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूंने आपल्या खेळांचे उत्कृष्ट प्रदर्शन करुन प्रथम स्थान प्राप्त केले असून चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता पात्र ठरली. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फुटबॉल मुले स्पर्धा कालिकत विद्यापीठ, कालिकत येथे दिनांक ३० जानेवारी ते ०९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधित आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करुन अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत ०८ वे स्थान प्राप्त करुन खेलो इंडिया स्पर्धेकरीता पात्र ठरले आहे.

फुटबॉल (मुले) चमू संघात ०१. मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाचा श्री रुतीक अतकर, श्री प्रज्योत तायडे व श्री ओम काशीकर, ०२. डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावतीचा श्री राज मिश्रा, श्री डुकीवाकोर ही, श्री ओमा हंग सुब्बा, श्री झाकीइसतूओ केट्स, श्री राहुल कुमार, श्री पलडेन धोनडुप, श्री अफिरमींग तलंग व श्री सोनम तमंग, ०३. जी.एस.टोम्पे महाविद्यालय, चांदुर बाजारचा श्री साहिल बेनीवाले व श्री सुफीयान अब्दुल ०४. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा श्री ओम धारव व श्री मुस्तफा शेख ०५. दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा श्री मोरवीन मोसेस ०६. इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगावचा श्री अभिषेक बुटके व श्री यश यादव ०७. विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा श्री रोमन खान ०८. श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा श्री रफिक खान यांचा समावेश होता. या चमूला व्यवस्थापक म्हणून डॉ.किरण पवार, इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांव तर प्रशिक्षक म्हणून श्री.राहूल भालेराव, डी.सी.पी.ई.अमरावती. यांचे मार्गदर्शन लाभले. संघाने प्राप्त केलेल्या या घवघवीत यशाबद्दल मा. कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आणि प्र.संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ डॉ. तनुजा राऊत व क्रीडा मंडळाच्या सर्व सदस्यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्यात.

# विद्यार्थ्यांनो, जास्तीत जास्त स्टार्टअप करा - कुलगुरू

## विद्यापीठात स्टार्टअप एक्सपो - २०२६ चे उद्घाटन



स्टार्टअप एक्सपो चे फित कापून उद्घाटन करतांना कुलगुरू

आजच्या युगात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या प्रवाहाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाची दिशा ठरवावी आणि जास्तीत जास्त स्टार्टअप करावे. विद्यापीठाच्यावतीने आपल्याला सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सीड फंड दिला जाईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ व विद्यापीठातील संशोधन आणि इन्क्युबेशन केंद्राच्यावतीने व्दिदिवसीय स्टार्टअप एक्सपो – २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर स्टार्टअप मेंटल इन्वेस्टर आणि थॉट लीडर तसेच लेमन आयडिया इकोसिस्टीमचे फाऊंडर ॲन्ड चीफ आयडिया फार्मर श्री दीपक मेनारीया, सेंट व्हिन्सेंट पलोट्टी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, नागपूरच्या सीएसई विभागाचे प्रमुख डॉ. मनोज ब्राम्हे, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी स्टार्टअप एक्सपो प्रदर्शनीचे फीत कापून उद्घाटन केले. मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले, देशातील एकूण स्टार्टअप पैकी ४८ टक्के स्टार्टप्समध्ये महिलांचा सक्रिय सहभाग आहे, ही बाब महिला सक्षमीकरणासाठी मोठी साक्ष आहे. भारतीय तरुण संशोधनात आघाडीवर असून ग्लोबल इन्नोव्हेशन इंडेक्समध्ये भारताने ४८ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला इन्नोव्हशन स्टार्टअप इंटरप्रीनियरशिप आणि संशोधन हा मंत्र देशाच्या प्रगतीचा कणा आहे. स्टार्टअप केवळ शहरापुरते मर्यादित नसून ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने स्टार्टअपमध्ये सहभागी होत आहे. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, बायोटेक आणि स्पेस टेक्नॉलॉजी यासारख्या आधुनिक विषयांवर लक्ष केंद्रित करावे. कुठलाही न्यूनगंड न बाळगता आपल्या सभोवतालच्या सामाजिक गरजा ओळखाव्या आणि त्यातून सेवाभावी स्टार्टअपची निर्मिती करावी. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी विद्यापीठ सीड फंड पुरवित असून स्टार्टअपसाठी उत्तम प्लॅटफॉर्म विद्यापीठाने उपलब्ध करून दिले आहे. अमरावती विद्यापीठाचे विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारे न बनता भविष्यात यशस्वी उद्योजक होतील, असा विश्वासही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

श्री दीपक मेनारीया म्हणाले, स्टार्टअप सुरू करण्यासाठी वय किंवा परीक्षेत मिळणारे गुण यांचा कोणताही संबंध नाही. अगदी सहा वर्षाच्या मुलांपासून ते ७८ वर्षाच्या वृध्दांपर्यंत कोणीही आपल्या कल्पनेने स्टार्टअप सुरू करू शकतो कृषी, पर्यावरण, उद्योग, मेडिकल, हर्बल प्रॉडक्ट्स आणि आयुर्वेद यासारख्या वैविध्यपूर्ण क्षेत्रांमध्ये स्टार्टअपच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. संस्कृती आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणारी कल्चर टेक ही नवी संकल्पना उदयास येत असून या क्षेत्रातही स्टार्टअपसाठी मोठा वाव असल्याचे ते म्हणाले. स्टार्टअप केवळ पैसा कमविण्यासाठी नसून समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी एक उत्तम माध्यम आहे. स्टार्टअप करणारा विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभा राहून अनेकांना नोक–या देणारा जॉब क्रियेटर बनतो. विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवतालच्या समस्यांचे बारकाईने निरीक्षण करून त्यावर आधारित उपाय शोधून स्टार्टअपच्या माध्यमातून सामाजिक योगदान द्यावे, स्टार्टअप सुरू करण्याकरिता केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना उपलब्ध आहेत, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा आणि केवळ स्टार्टअपच्या माध्यमातून उत्पादन करणे पुरेसे नाही, तर आपला माल ग्राहकांपर्यंत कसा पोहोचवायचा आणि तो कसा विकायचा हे तंत्र सुध्दा आजच्या काळात आत्मसात करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

डॉ. मनोज ब्राम्हे म्हणाले, २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्टार्टअप इंडिया योजनेमुळे देशात मोठी औद्योगिक क्रांती झाली. संत गाडगे बाबांच्या जनसेवा हीच ईश्वर सेवा या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांनी समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी स्टार्टअप सुरू करावे. आजच्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सायबर सेक्युरिटी या विषयांची गरज ओळखून या क्षेत्रातील कौशल्य विकसित करण्याची गरज आहे. शेतीमधील कष्टाची कामे कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर, ग्रामीण भागात टेलीमेडिसीन सुविधा द्वारे आरोग्यसेवा पोहोचवणे, शासकीय कामात गतिमानता आणि पारदर्शकता आणण्यासाठी स्टार्टअपचा उपयोग करणे आवश्यक आहे. नागपूर हे लॉजिस्टिक हब म्हणून विकसित होत असल्याने तेथे सप्लाय चेन आणि लॉजिस्टिक क्षेत्रात स्टार्टअपसाठी प्रचंड वाव आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या स्टार्टअपसाठी अनेक सवलती आणि योजना आहेत. विद्यार्थ्यांनी त्याचा पुढे लाभ घ्यावा, असे ते म्हणाले.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्तविक ननसा संचालक डॉ. अजय लाड यांनी, पाहुण्यांचा परिचय इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर यांनी करून दिला. संचालन व आभार डॉ. सुलभा पाटील यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या  संख्येने विद्यार्थी उपस्थित होते



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री दिपक मेनारीय संवाद साधतांना



डॉ. मनीष ब्राम्हे संवाद साधतांना











स्टार्टअप स्टॉलवरील स्टार्टअपची पाहणी करतांना मान्यवर







# राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन परेडमध्ये विद्यापीठाचे रासेयो स्वयंसेवक सहभागी होणार


कु. मैथिला सरोदे


कु. सलोनी भट्ट


कु.राजेश्वरी आसोले


कु.हेमलता पवार


गितेश आगरकर


ओम वाकुडकर


कृष्णा मोरे


सचिन साबळे

२६ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथील शिवाजी पार्क येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन परेडकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे आठ स्वयंसेवक सहभागी झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो कक्षाच्यावतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन परेड निवड चाचणीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आठ स्वयंसेवकांची निवड करण्यात आली होती. यामध्ये महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी विज्ञान महाविद्यालय वरूडचा गितेश आगरकर, जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय खामगांवचा ओम वाकुडकर, जिजामाता महाविद्यालय, बुलडाणाचा कृष्णा मोरे, श्री. आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा सचिन साबळे, बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय यवतमाळची कु. मैथीली सरोदे, प्रो.राम मेघे इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट महाविद्यालय, बडनेराची कु. सलोनी भट्ट, पंकज लध्दड इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड मॅनेजमेंट स्टडिज बुलडाणाची कु. राजेश्वरी आसोले व श्रीमती एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोलाची कु. हेमलता पवार या स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन परेडच्या संघात स्थान मिळाल्याबद्दल सर्व स्तरावरुन त्यांचे कौतूक होत आहे.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी स्वयंसेवकांची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन परेडमध्ये निवड झाल्याबद्दल सर्व स्वयंसेवकांचे अभिनंदन व भरभरुन कौतूक केले. तसेच प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू यांनीही सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतूक करुन पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या

## विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत एम.बी.ए. विभागाच्या विद्यार्थीनींना कलर कोट पुरस्कार प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते विद्यार्थीनींचा गौरव



संत गाडगे बाबा अमरवती विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एम.बी.ए.) विभागाच्या विद्यार्थीनी कु. समिक्षा घाटोळ व कु. पल्लवी वानखडे यांच्या 'इन्नोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' या प्रकल्पाला कलर कोट पुरस्कार मिळाला आहे. प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते सदर विद्यार्थीनींना पुरस्काराने गौरविण्यात आले.

विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत एम.बी.ए. विभागातील विकी कालबांडे, कु. सोनाली खोब्राागडे, अभिषेक गुल्हाने याही विद्यार्थ्यांनी आपापले संशोधन प्रकल्प सादर केले होते. कु. समिक्षा व कु. पल्लवी यांनी सादर केलेल्या 'इन्नोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' प्रकल्पास पुरस्कार प्राप्त झाला. 'इन्नोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' या प्रकल्पात उपद्रवी तणापासून डास प्रतिबंधक स्प्रे आणि रुम फ्रेशनर अशी हर्बल उत्पादने तयार करण्यात आली आहेत. ही उत्पादने स्वस्त, पर्यावरणपुरक व लहान मुले तसेच मोठ्यांसाठी सुरक्षित आहेत. त्यामुळे सदर उत्पादने ही रासायनिक घरगुती वस्तुंना चांगला पर्याय ठरू शकतात. त्याचबरोबर घर, कार्यालये, शाळा, रुग्णालये, वसतिगृहे, सार्वजनिक ठिकाणी वापरण्यासाठी उपयुक्त असून पर्यावरणाशी संबंधित समस्या सोडविण्यास मदत होते. विद्यार्थ्यीनींच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

## विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



राज पारखी | साक्षी चोपकर | स्नेहल शिवणकर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी राज अनिल पारखी (प्रथम), कु. साक्षी गजानन चोपकर (तृतीय) व कु. स्नेहल रघुनाथ शिवणकर (पाचवा) विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एम.एस्सी. भाग–२ भौतिकशास्त्र विषयाच्या परीक्षेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, डॉ. जी.जी. मुळे, प्रा. कु. श्वेता वाघमारे, प्रा. प्रियांका गोळे, प्रा. एस.व्ही. राठोड, प्रा. एन. एस.थोरात, प्रा. व्ही. ए. लोडे, प्रा.व्ही.डी. भोरजार या शिक्षकवृंदांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा–यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

भौतिकशास्त्र विभागाचे आतापर्यंत २५ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत, त्यात अनेक विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. विज्ञान स्नातकोत्तर ( मास्टर ऑफ सायन्स) भौतिकशास्त्र हा अभ्यासक्रम करून अनेक विद्यार्थी, वैज्ञानिक, रेडिओलॉजिस्ट, हवामानशास्त्रज्ञ, फॉरेन्सिक लॅबमध्ये विश्लेषक, आयएएस, वायरलेस स्ट्रीममध्ये पोलीस अधीक्षक, प्राध्यापक, व्याख्याते, शिक्षक, दूरसंचार अधिकारी म्हणून नियुक्त झालेले आहेत. विभागामध्ये शैक्षणिक मूल्यांची जोपासना, शिस्त राखणे, संशोधनासाठी प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी वृत्तीचा प्रसार करणे यासाठी मेहनत घेतली जाते, जेणेकरून विद्यार्थी सक्षम होतील.



# विद्यार्थी संघटनांशी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी साधला संवाद
## विद्यार्थी हिताच्या समस्यांना सर्वोच्च प्राधान्य : कुलगुरू



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये झालेल्या विद्यार्थी संघटनांच्या सभेत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थी समस्यांना सर्वोच्च प्राधान्य देत विद्यार्थी हिताच्या समस्या सोडविण्यात येतील असे आश्वासन विद्यार्थी संघटनांना दिले.

मंगळवार दि. २० जानेवारी रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती सभागृह येथे विद्यापीठ परिक्षेत्र अंतर्गत येणा–या पाचही जिल्हांमधील विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींची सभा संपन्न झाली. या सभेत विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या कुलगुरूंसमोर मांडतांना प्रश्न देखील उपस्थित केले. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व प्रतिनिधींनी मांडलेल्या समस्यां आत्मियतेने ऐकून घेत विद्यार्थी हिताचे निर्णय विद्यापीठ सदैव घेत राहील आणि विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यास प्रथम प्राध्यान्य दिले जाईल, असे कुलगुरूंनी विद्यार्थी संघटनांना आश्वस्त केले. सभेला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. अविनाश बोर्डे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विद्यार्थी विकास संचालक तथा समितीचे सदस्य सचिव डॉ. राजीव बोरकर, अधिसभा सदस्य डॉ. रितेश खुलसाम, श्री अमोल ठाकरे, श्री कैलाश चव्हाण, श्री अमोल देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच युवा सेनेचे योगेश सोळंके, ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनच्या कु. प्रतिक्षा ढोके, एन.एस.यु.आय.चे श्री संकेत शाहु, आकाश गेडाम, सचिव श्री अर्पित गौरखेडे, श्री शुभम बांबल, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद, अकोलाचे ॲड. आकाश हिवराळे, आदित्य अवचार, विद्यार्थी सेनेचे इम्रान सय्यद, आय. वाय. सी. चे श्री कुणाल जोध, युवा स्वाभिमान पार्टीचे पंकज सुरडकर, कु. साक्षी उमक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे श्री निकेत कलाने, श्री अर्जून ठाकरे, तृष्णा चव्हाण आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन, प्रास्ताविक व आभार डॉ. राजीव बोरकर यांनी मानले.



# बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळेला राज्यस्तरीय अश्वमेध क्रीडा महोत्सवात रजत पदक



नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य अंतरविद्यापीठ अश्वमेध क्रीडा महोत्सवामध्ये बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची बी.एस्सी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी कु. पुनम बंगाळे हिने रजत पदक पटकावून दैदिप्यमान यश संपादित केले आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रभरातील सर्व विद्यापीठाचे हजारो खेळाडू ॲथलेटिक्स व इतर खेळांमध्ये सहभागी झाले होते.

कु. पुनम हिने यापूर्वी विद्यापीठस्तरीय २०० मीटर धाव स्पर्धा आणि ४०० मीटर रिले रेस या दोन्ही स्पर्धा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. कु. पुनम हिचा महाविद्यालयीन स्तरावर सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सत्कार करून भरभरुन शुभेच्छा दिल्या. या यशामागे महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले. भविष्यात कु. पुनम राष्ट्रीय पातळीवर नक्कीच मॉडेल डिग्री कॉलेजचे नांव आणखी उज्वल करून देईल, असा विश्वास याप्रसंगी प्राचार्य डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी व्यक्त केला.



# आहार प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यापीठातील गृह विज्ञान विभाग व झेनिथ हॉस्पिटलचे संयुक्त आयोजन

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभाग व अमरावती शहरातील प्रसिध्द झेनिथ हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज येथे हृदयरोगांसाठी आरोग्य कार्यक्रमांतर्गत आहार प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शनीमध्ये गृहविज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी आहाराविषयी विविध मॉडेल व पोस्टरव्दारे आहाराविषयी नागरिकांना जागरुक केले.

हृदय रुग्णांनी कोणते पदार्थ सेवन करावेत, कोणते टाळावेत, प्रक्रिया केलेले अन्न, मैद्याचे पदार्थ, बिस्किटे, शीतपेयांचे दुष्परिणाम, मीठ, साखरेचे अति सेवन टाळण्याचे महत्त्व विद्यार्थिनींनी प्रभावीपणे सांगितले. त्याचबरोबर प्रथिने, फायबरयुक्त अन्नपदार्थ, कडधान्ये, फळे, पालेभाज्या व धान्यांचा समावेश केल्यास आरोग्य व हृदयावर होणारे सकारात्मक परिणाम प्रत्यक्ष मॉडेल्सद्वारे नागरिकांना पटवून देण्यात आले. तळलेले पदार्थ, फास्टफुड, मैदा, बिस्किटे, साखरयुक्त शीतपेये, प्रक्रिया केलेले मांस व जंकफुड यांचे अतिसेवन ह्रदय व आरोग्यास कसे हानिकारक ठरते, याची माहिती नागरिकांना देतांना अन्नगटांची ओळख, फुड पिरॅमिडचे महत्त्व, दैनंदिन आहारात भाज्या, फळे, धान्ये व प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश कसा करावा, तेल, साखर, जंकफुडचे मर्यादित सेवन का आवश्यक आहे याविषयी सुध्दा मार्गदर्शन करण्यात केले.

आहार प्रदर्शनीला किशोरवयीन मुलांपासून तर ज्येष्ठ नागरिकांनी भेट दिली. कार्यक्रमासाठी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांचे मार्गदर्शन लाभले. प्रदर्शनीच्या यशस्वीतेकरिता विभागातील शिक्षक आयतल कामदार, भक्ती सोंदिया, सुमेध वडूरकर तसेच झेनिथ हॉस्पिटलचे आहारतज्ज्ञ काजल केशवानी, किरण ठाकरे, समृध्दी वानखडे यांचे सहकार्य लाभले.



आहार प्रदर्शनी क्षणचित्रे














# मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाने पुढाकार घ्यावा - डॉ. के.बी. नायक
## विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची मतिमंद मुलांच्या शाळेला शैक्षणिक भेट




मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनासोबतच समाजानेही सक्रीय भूमिका घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. के. बी. नायक यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून अमरावती शहरातील निवासी मतिमंद मुलांच्या शाळेला भेट दिली. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

डॉ. नायक यांनी मतिमंद मुलांसाठी विशेष योजना राबविण्याची आवश्यकता असून त्यांच्या शिक्षण, आरोग्य, पुनर्वसनासाठी अधिक व्यापक धोरणांची अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे नमूद करुन मतिमंद मुलांच्या विविध समस्यांसंदर्भात संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवून विद्यापीठ स्तरावर संशोधन होणे अत्यंत गरजेचे असून त्या माध्यमातून मतिमंद मुलांच्या विकासाकरिता नवीन संधी उपलब्ध करून देता येतील, जेणेकरुन अशा विद्यार्थ्यांना समाजामध्ये प्रतिष्ठेने जीवन जगण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री उमेश धुमाळे यांनी मतिमंद मुलांना भेडसावणा–या विविध शैक्षणिक, मानसिक व सामाजिक समस्यांची माहिती उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना दिली. तसेच शाळेतील अध्यापकांनी वस्तीगृह व शाळेमधील सुविधांची माहिती दिली. याप्रसंगी विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतिमंद विद्यार्थ्यांसोबत नृत्य, गाणे यांसारखे मनोरंजनात्मक उपक्रम राबवून शाळेतील मुलांचा आनंद व्दिगुणित केला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना फळ व खाऊचे वाटप करण्यात आले. ही शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणीव वाढविणारी व मतिमंद मुलांच्या जीवनातील अडचणी समजून घेण्यास उपयुक्त ठरली.

शाळा व्यवस्थापनाने या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले. संचालन संशोधक विद्यार्थीनी निर्मल काळबांडे, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. याप्रसंगी समाजशास्त्र विभागातील डॉ.के.यु. राऊत, डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे,संशोधक विद्यार्थी राजकुमार सरयाम, रमेश पवार, गोपाल वानखडे, शिक्षकेत्तर कर्मचारी प्रवीण गडलीनकर, प्रतिष्ठित नागरिक व समाजसेवक श्री नारायण पवार तसेच शिक्षकवृंद श्री अनिल वाळके, कु. श्रध्दा काळबांडे, प्रेरणा बाहे, श्री निखिल बारबुध्दे, श्री विशाल शिवाने, श्री मुकुंद बडगे, श्री अजय कराड, कु. ज्योती कळसकर उपस्थित होते.







# विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात विविध उपक्रम व माजी विद्यार्थी मेळावा संपन्न



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अभ्यासेत्तर उपक्रमांतर्गत रांगोळी स्पर्धा, पोस्टर प्रदर्शनी, वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवित सर्जनशीलता, विचारशक्ती व बौध्दीक क्षमता सादर केली. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

त्याचप्रमाणे विभागाच्यावतीने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला विभागातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रवासातील अनुभव कथन करीत विभागाशी असलेले ऋणानुबंध व्यक्त केले. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. के. यू. राऊत हे होते.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. के. बी. नायक यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण व सामाजिक जाणीव विकसित होते, असे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. रोहिणी वावरे, तर आभार प्रा.साधना इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. प्रशांत भगत, प्रा. सुनिता इंगळे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संकल्प दौडमध्ये शेकडो शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग

## स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे आयोजन



हिरवी झेंडी दाखवून संकल्प दौडची सुरूवात करतांना श्रीमती श्रध्दा व्यास व मान्यवर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, श्रीरामकृष्ण विवेकानंद समिती व विवेकानंद ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्ताने आयोजित संकल्प दौडमध्ये अमरावती शहरातील शेकडो शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी व मुंबई येथील स्वामी विवेकानंद तत्त्वज्ञानाच्या अभ्यासक, समाजसेविका श्रीमती श्रध्दा व्यास यांनी हिरवी झेंडी दाखवून संकल्प दौडची विवेकानंद कॉलनी येथून सुरुवात करण्यात आली. त्यानंतर ही संकल्प दौड रुख्मिणीनगर, काँग्रेसनगर मार्गे प्रशांतनगर येथील बगिचाजवळील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याला हारार्पण करुन संकल्प दौडचा समारोप करण्यात आला. प्रारंभी स्वामी विवेकानंद कॉलनी येथील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व हारार्पण करण्यात आले. यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, विवेकानंद ग्रंथालयाचे अध्यक्ष डॉ. अमरसिंह राठोड, श्रीरामकृष्ण विवेकानंद समितीचे अध्यक्ष श्री हरिहर जिराफे, स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. योगेश्वर कुरवाडे, गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा - अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे

## विद्यापीठात राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन संपन्न





मार्गदर्शन करतांना डॉ. नितीन कोळी

महापुरुषांचे विचार नवीन पिढीला दिशादर्शक असतात. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचार व कार्यापासून विद्यार्थ्यांनी आदर्श घेवून आपल्यातील कला, कौशल्य व व्यक्तीमत्व विकसित करावे, असे प्रतिपादन मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले, उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजक तथा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ. मोना चिमोटे यांनी केली. त्या पुढे म्हणाल्या, स्वराज्य प्रस्थापित करण्यासाठी राजमाता जिजाऊ यांनी शिवरायांसारखा महान सुपूत्र घडविला. सर्वगुण संपन्न शिवराय आज आम्हां सर्वांचे आदर्श आहेत. महाराजांना राजमाता जिजाऊंनी सर्व कौशल्ये व विद्यांमध्ये पारंगत केले. त्यांनी आपल्या राज्य कारभारात स्त्रियांचा सन्मान केला, त्यांना समान संधी दिली. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंद यांचे स्मरण जयंतीप्रसंगी होत आहे. स्वामी विवेकानंद यांनी दिलेले विचार हे युवकांसाठी प्रभावी असून त्यातूनच युवक बलशाली होवू शकतो. विद्यार्थ्यांमधील कलागुण व व्यक्तीमत्व विकसित व्हावे, यादृष्टीने आयोजित वक्तृत्व स्पर्धा निश्चितच विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार असून आपल्यातील उपयुक्तता या स्पर्धेच्या निमित्ताने युवक सिद्ध करतील, असे सांगून त्यांनी जयंतीदिनाच्या शुभेच्छा दिल्यात.

प्रमुख अतिथी डॉ. नितीन कोळी म्हणाले, सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे, हा उपदेश राजमाता जिजाऊ यांनी दिला. त्यांनी राज्य कारभार करतांना सर्वांना समानतेची वागणूक दिली. सर्व जाती–धर्म–पंथांच्या लोकांना समान मानले आणि म्हणूनच शिवाजी महाराज इतिहास घडवू शकले, आदर्श राजा झाले आणि त्यांचा आदर्श आजही आम्हाला प्रेरणा देत आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीप्रसंगी 'जिजाऊ लेक' हा पुरस्कार देवून महिलांचा सन्मान केल्या जातो, ही खरोखरच गौरवास्पद बाब आहे. याप्रसंगी त्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्यात.




डॉ. स्वाती शेरेकर यांना जिजाऊ लेक पुरस्कार देवून सन्मान करतांना
प्र. कुलसचिव डॉ. नितीन कोळी व डॉ. मोना चिमोटे



उद्घाटनीय भाषण करतांना डॉ. मोना चिमोटे

**‘जिजाऊ लेक’ पुरस्काराने डॉ. स्वाती शेरेकर सन्मानित**

इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर यांचा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे यावर्षी ‘जिजाऊ लेक’ हा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी व अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांनी गौरव प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून त्यांना सन्मानित केले. याप्रसंगी बोलतांना डॉ. स्वाती शेरेकर म्हणाल्या, पुरस्कारासाठी माझी निवड केल्याबद्दल व पुरस्काराने मला सन्मानित केल्याबद्दल सर्वांचे आभार मानते. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांनी दिलेले विचार पुढे न्यावेत आणि त्यांचा आदर्श सदैव आपल्या मनात ठेवावा, असे सांगून त्यांनी इन्क्युबेशन सेंटरद्वारे चालविल्या जाणारे विविध उपक्रम, मिळालेले अनुदान आदींची माहिती दिली. स्टार्टअप सुरु करण्याकरीता विद्यार्थ्यांनी सेंटरला भेट द्यावी व आपले स्टार्टअप सुरु करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविकतेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी वक्तृत्व स्पर्धा आयोजनामागील भूमिका विषद केली. सर्व युवक व युवतींनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे कृतीशील विचार आत्मसात करावे आणि देश विकासामध्ये आपले योगदान द्यावे, असे सांगितले. विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. राजमाता जिजाऊ, संत गाडगे बाबा व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेकरीता असलेले परीक्षक डॉ. वैभव म्हस्के, प्रा. अभिजित इंगळे, प्रा. पुजा अलोणे, डॉ. मनिषा इंगलकर, श्री प्रफुल्ल कुबडे तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. संचालन प्रा. आदित्य पुड यांनी, तर आभार प्रा. अनघा देशमुख यांनी मानले. प्रा. रोहिणी वावरे यांनी डॉ. स्वाती शेरेकर यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# विद्यापीठातील वक्तृत्व स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' आणि 'एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन' यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले.



स्पर्धेसाठी 'राजमाता जिजाऊ यांची विचारधारा व संस्कारांची आजच्या समाजातील उपयुक्तता', 'राजमाता जिजाऊ : स्त्री नेतृत्वाचा ऐतिहासिक आदर्श' आणि 'स्वराज्य निर्मितीतील जिजाऊंचे मातृत्व व नेतृत्व' असे तीन विषय ठेवण्यात आले होते. स्पर्धक विद्यार्थ्यांनी तीनही विषयांवर अत्यंत प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि भावनिक मांडणी करत माँ जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले. प्रथम पुरस्कार साक्षी पवार हिला ५००१,



द्वितीय प्रतिक्षा दापूरकर हिला ४००१, तृतीय मनश्री अढाऊ ३००१, चतुर्थ पुरस्कार तन्वी मानकर हिला २००१ व उत्तेजनार्थ १००१ रु. चा पुरस्कार कु. पल्लवी नेरकर या विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करुन गौरविण्यात आले. स्पर्धेचे परिक्षण डॉ. वैभव मस्के, प्रा. अभिजित इंगळे, डॉ. मनिषा इंगलकर, प्रा. पुजा अलोणे व श्री प्रफुल्ल कुबडे यांनी केले.

याप्रसंगी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच परिक्षक डॉ. वैभव मस्के, प्रा. अभिजित इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. आदित्य पुंड, तर आभार डॉ. अनघा देशमुख यांनी मानले. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.







# सावित्रीबाई फुले शिक्षकांचे आदर्श - डॉ. श्रीकांत पाटील



गेल्या दीडशे वर्षात भारताने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली असून अगदी अंतराळ क्षेत्रातही भरीव योगदान देतांना महिलांची कर्तबगारी सर्वश्रूत आहे. शिक्षण क्षेत्रात सुध्दा स्त्रियांनी यशस्वी कार्याची वाटचाल केली असून समाजाला संस्कारित करण्याची भूमिका पार पाडताना दिसत आहेत. सावित्रीबाईची हिच ज्ञानज्योत तेजस्वी ठेवण्यासाठी शिक्षक नेहमीच सावित्रीबाईच्या शैक्षणिक कार्याचा आदर्श घेतात, त्यामुळे शिक्षकांचे आदर्श सावित्रीबाई फुले असल्याचे प्रतिपादन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. ते आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये आयोजित सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करतांना बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख वक्ता म्हणून एम.ए.योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या डॉ. अनघा देशमुख, प्रा. अर्चना ढोरे, डॉ. वैभव मस्के उपस्थित होते.

डॉ. श्रीकांत पाटील पुढे म्हणाले, स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी सावित्रीबांइचे विचार आणि त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. तरुण पिढीला मूल्य संस्कारित शिक्षण देऊन शिक्षकांनी समाजात आदर्श नागरिक घडवावा, जेणेकरून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येतील व सावित्रीबाईना अपेक्षित असलेला समाज निर्माण होईल.

डॉ. अनघा देशमुख म्हणाल्या, सावित्रीबाईनी तत्कालीन समाजातील अनिष्ठ चालीरीती, रूढी – परंपरांच्या निर्मूलनासाठी समाजप्रबोधन केले. स्त्रियांचा सन्मान, त्यांना असलेल्या अधिकारांची जाणीव करून देत त्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. आजच्या समाजातील स्त्रियांनी आपले कर्तृत्व ओळखून विकास कार्यात सहभाग नोंदवावा, जेणेकरून सावित्रीबांइना अपेक्षित असलेला समाज निर्माण होईल. संचालन प्रा.वैभव जिस्कार, तर आभार प्रा.शुभम पाचखंडे यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



# विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात 'निसर्ग असमतोल व पर्यावरण संवर्धन' विषयावर व्याख्यान संपन्न



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात 'निसर्ग असमतोल व पर्यावरण संवर्धन' विषयावर नुकतेच अतिथी व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख डॉ. के.बी. नायक, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. यू. राऊत, मार्गदर्शक म्हणून जवाहर नवोदय विद्यालयातील सेवानिवृत्त ग्रंथपाल श्री नारायण पवार उपस्थित होते.

श्री पवार यांनी व्याख्यानातून निसर्गातील असमतोलाची कारणे, मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विषद केले. पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक व्यक्तीने त्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे ते म्हणाले. व्याख्यानातून पर्यावरणीय असमतोल, त्याची कारणे व उपाययोजना याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

व्याख्यानानंतर श्री नारायण पवार यांनी तयार केलेल्या बीज बँकेचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. यात स्थानिक व दुर्मिळ वनस्पतींच्या विविध बियाण्यांचा समावेश होता. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी बीज बँकेचे महत्त्व प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे स्पष्ट करण्यात आले. तसेच काही बियाण्यांची समाजशास्त्र विभागाच्या परिसरात प्रात्यक्षिक स्वरुपात लागवड करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. के.बी. नायक यांनी पर्यावरण संवर्धनाचे समाजशास्त्रीय अभ्यासातील अनन्यसाधारण महत्त्व सांगितले. पर्यावरण संवर्धन व शाश्वत विास यांचा परस्परसंबंध स्पष्ट करतांना विद्यार्थ्यांनी संशोधनवृत्ती वाढवावी, असे ते म्हणाले. सूत्रसंचालन डॉ. प्रशांत भगत, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील प्रा. साधना इंगोले, डॉ. रोहिणी वावरे, संशोधक विद्यार्थी राजकुमार सरयाम, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री प्रवीण गडलिंगकर, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्व विद्या आत्मसात करा, स्वत:ला घडवा - डॉ. शरद निंबाळकर यांचे युवकांना आवाहन

## विद्यापीठात राष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा संमेलन उत्साहात



उद्घाटनीय भाषण करतांना डॉ. शरद निंबाळकर

एक माणूस काय करू शकतो, हे विविध उदाहरणांव्दारे पटवून देतांना विद्या आत्मसात करा, स्वत:ला घडवा, असे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी युवकांना केले. स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस दरवर्षी राष्ट्रीय युवा दिन म्हणून संपूर्ण भारतात साजरा करण्यात येतो, त्यानिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, विद्यार्थी विकास विभाग आणि श्रीरामकृष्ण विवेकानंद समिती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवा संमेलनाचे उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे,



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

मुंबई येथील स्वामी विवेकानंद तत्वज्ञानाच्या अभ्यासक तथा समाजसेविका श्रीमती श्रध्दा व्यास, श्रीरामकृष्ण विवेकानंद समितीचे अध्यक्ष श्री हरिहर जिराफे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. योगेश्वर कुरवाडे उपस्थित होते.

डॉ. शरद निंबाळकर म्हणाले, स्वामी विवेकानंद म्हणजे आत्मविश्वास, चारित्र्य आणि ज्ञानाचा



स्वामी विवेकानंद यांचे विचार मांडतांना श्रीमती श्रध्दा व्यास

समूह होय. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांचा वनवास संपविला आणि आज महिला सर्वोच्च पदावर आसनस्थ आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानरुपी पुस्तकातून प्रत्येकाला स्वातंत्र्य बहाल केले. त्यामुळे एक माणूस काय करु शकतो, हे स्पष्ट होते आणि विद्यार्थ्यांनो, स्वत:ला कमी लेखू नका. युरोपीय देशांमध्ये सुध्दा महिलांचा वनवास संपलेला नव्हता, त्यांनाही त्यांच्या अधिकारासाठी लढा द्यावा लागला. प्रज्ञा हा बुध्दीच्या पलिकडे मनाचा आविष्कार आहे. त्यामुळे कधीही स्वत:ला दुर्बल समजू नका. स्वत:ला घडवा, त्यासाठी तसे तयार करा. ईश्वर सुध्दा सत्पुरुषचरणी लीन होतो, असे सांगून जेव्हा सर्व एकदिलाने ऐकतील तेव्हा न्याय प्रतिष्ठीत होईल, असेही डॉ. निंबाळकर म्हणाले.



अतिथी विचार व्यक्त करतांना व्य.प.सदस्य डॉ. मनिषा कोडापे

प्रमुख अतिथी डॉ. मनिषा कोडापे म्हणाल्या, स्वामी विवेकानंद यांच्या विचारातून प्रेरणा मिळते. अपयशाला घाबरू नये, कारण तेच यशाची पहिली पायरी सुध्दा असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वत:मधील आत्मविश्वास जागवा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

श्रीमती श्रध्दा व्यास म्हणाल्या, स्वामी विवेकानंदांच्या जीवनातही गुरूंचे मोठे स्थान आहे. एकाग्रता कशी महत्वाची आहे, हे त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे शिकागो येथील ग्रंथालयाचे उदाहरण देवून स्पष्ट केले. एकाग्रतेनंतरची क्रिया म्हणजे समाधी होय. स्वामी विवेकानंद जेव्हा इतरांना देव पाहिला का असे जेव्हा विचारायचे, तेव्हा त्यांच्या शिक्षकांनी त्यांना रामकृष्ण परमहंस यांचे नाव सांगितले आणि प्रत्येकामध्ये देवत्व असल्याचे सांगून आत्मतत्वच आत्मतत्वाला साद घालीत असतो, असेही त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय भाषणातून प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्यावर प्रकाश टाकतांना नागपूर येथील रामकृष्ण परमहंस मठाच्या विद्यार्थ्यांचे उदाहरण दिले व स्वामी विवेकानंद यांच्या विचाराने विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

संत गाडगे बाबा व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. राजीव बोरकर यांनी, सूत्रसंचालन श्री श्रीकृष्ण पखाले यांनी, तर आभार प्रा. योगेश्वर कुरवाडे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संकल्पनांना संशोधनाची जोड द्या - डॉ. योगेश ब्राम्हणकर विद्यापीठाच्या बायो टेक्नॉलॉजी विभागात 'व्हिजीनरी : डॉ. योगेश ब्राम्हणकर यांच्याशी संवाद' कार्यक्रम संपन्न



डॉ. योगेश ब्राम्हणकर मार्गदर्शन करतांना

आज आपल्याकडे सर्व सुविधा आहेत. परंतु पूर्वी अशा सुविधा नसतांनाही अनेकांनी नवोपक्रम घडविले, जे आपण आज सन्मानाने बघतो. आपल्या आजुबाजुला सुध्दा असे नवोपक्रम सुरू असतात, मात्र आपण ते दुर्लक्षित करीत असतो. त्यामुळे आत्मविश्वास जागवा, न्यूनगंड बाजूला ठेवा आणि आपल्यातील संकल्पनांना संशोधनाची जोड द्या. एवढ्यावरच थांबू नका, तर आपल्या संशोधनाला बाजारपेठ सुध्दा मिळाली पाहिजे असे प्रयत्न करा. तेव्हाच तुमचे संशोधन ग्राहकापर्यंत पोहचून किंमत मिळेल, असे मार्गदर्शन भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयातील इनोव्हेशन सेलचे संचालक डॉ. योगेश ब्राम्हणकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्यावतीने आयोजित 'व्हिजनरी : डॉ. योगेश ब्राम्हणकर यांच्याशी संवाद' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेसचे संचालक डॉ. अजय लाड, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव उपस्थित होते.

डॉ. ब्राम्हणकर मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले, कोणतेही साधन विकत घेत असतांना आपली जी वृत्ती असते, तीच संशोधनाकरिता सुध्दा वापरावी, जेणेकरुन ग्राहकांमधील वृत्ती आपल्या संशोधन निर्मितीत येईल. त्यानंतर आपले संशोधन साधन बाजारात आणून त्यातील उणीवा सुध्दा ग्राहकांकडून माहिती करुन घ्याव्यात. विदेशात होत असलेल्या नवोपक्रमांना पाहून आपल्याला हसू येईल, पण आपण ते करितच नाही. त्यामुळे आपल्यातील संकल्पना प्रत्यक्षात उतरवा. व्यापारी दृष्टीकोनातून आपल्या संशोधन साधनाकडे बघा असे सांगून प्रायोगिक तत्वावर अधिक भर द्या असेही ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन संशोधन साधनांबाबत योग्य ते मार्गदर्शन केले.

ननसा संचालक डॉ. अजय लाड म्हणाले, नवोपक्रम खरे तर ग्रामीण भागात अधिक होतात. त्यामुळे



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना डॉ. प्रसाद वाडेगावकर

नवसंशोधन साध्या भाषेत व्हावे, जेणेकरुन ते सर्वांना समजेल, असे सांगून आयोजित केलेल्या उपक्रमांबद्दल त्यांनी माहिती दिली. इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी मनोगतातून इन्क्युबेशन सेंटरव्दारे राबविण्यात येत असलेले उपक्रम तसेच नवनवीन नवोपक्रमांबद्दल माहिती दिली.



मार्गदर्शन करतांना डॉ. अजय लाड

अध्यक्षीय मनोगतातून डॉ. प्रसाद वाडेगावकर यांनी आमचे प्रयत्न योग्य मार्गाने सुरू आहेत असे सांगून विविध बुट कॅम्प, आविष्कार, प्रदर्शनी अशा उपक्रमांमध्ये विभागाच्या विद्यार्थ्यांनी मिळिवलेल्या यशाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमामागील भूमिका श्री आनंद यादव यांनी मांडली. संचालन व आभार अमोल हिरुळकर यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. अनिता पाटील, डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे, माजी विद्यार्थी डॉ. संतोष चव्हाण तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मनोगत व्यक्त करतांना डॉ. स्वाती शेरेकर



कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी – विद्यार्थीनी

# राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होणा-या चमूंना कार्यशाळेतून मार्गदर्शन
## विद्यापीठाच्या आविष्कार सेलचा प्रशंसनीय उपक्रम
## २८ ते ३१ जानेवारी रोजी परभणी येथे राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा संपन्न



विद्यापीठस्तरावर पार पडलेल्या आविष्कार स्पर्धेत निवड झालेल्या ४७ विद्यार्थ्यांची चमू येत्या २८ ते ३१ जानेवारी, २०२६ दरम्यान परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत सहभागी झाले. त्याकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अविष्कार सेलच्यावतीने सदर चमूंसाठी मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी चमूंना तज्ज्ञांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. सुजाता काळे, डॉ. स्वाती शेरेकर, डॉ. हेमलता नांदुरकर, डॉ. कमलाकर मोरे, डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे, डॉ. अनिता पाटील, डॉ. जागृती बारब्दे, डॉ. शितलबाबू तायडे, डॉ. दीपक चाचरकर, डॉ. संध्या भगत, प्रा. पल्लवी कांदळकर या तज्ज्ञांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, वैद्यक व फार्मसी, शुध्द विज्ञान, मानवविद्या–भाषा, ललित कला तसेच वाणिज्य – व्यवस्थापन व कायदा अशा विविध श्रेणींनुसार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुस–या सत्रात डॉ. वर्षा नाठार, डॉ. प्रणव कोलते, डॉ. राजेश भोयर, डॉ. जयंत वडतकर यांनी महत्त्वपूर्ण सूचना, मूल्यांकन निकष तसेच राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी आवश्यक डूज अँन्ड डोन्टस याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.





# संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भतेमुळे भारताचे ऑपरेशन सिंदुर यशस्वी - काशीनाथ देवधर

## विद्यापीठात "ऑपरेशन सिंदुर आणि आत्मनिर्भर भारत" विषयावर व्याख्यान संपन्न




विषयाची मांडणी करतांना श्री काशीनाथ देवधर

१९६५ च्या युध्दात भारताला विजय मिळाला असला तरी शस्त्रास्त्र तंत्रज्ञान भारताला विदेशाचे घ्यावे लागले होते, मात्र आता भारत संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होत असून स्वदेशी बनावटीचे शस्त्रास्त्र भारत निर्माण करीत आहे. त्यामुळेच भारताला ऑपरेशन सिंदुरमध्ये यश मिळाले, असे प्रतिपादन पुणे येथील डीआरडीओ चे सेवानिवृत्त समूह संचालक श्री काशीनाथ देवधर यांनी केले. ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र सभागृहात आयोजित 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारमंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, पुणे येथील माजी प्राचार्य तथा नॅक मूल्यांकन समितीचे माजी सदस्य डॉ. नागनाथ धर्माधिकारी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

श्री देवधर पुढे म्हणाले, भारतावर आतंकवादी हल्ले झाले, परंतु भारताने नेहमीच शांततेचा मार्ग अवलंबिला आहे. युध्द नको, बुध्द हवा असे भारताने आपले शांततेचे ब्रिद अवलंबिले आहे. असे असले तरी आमच्या सहनशीलतेचा कोणी अंत पाहू नये, आम्हीही जशास तसे उत्तर देवू असे भारताने जगाला ठणकावले. २०१४ नंतर भारताचे चित्र बदलले आणि आतंकवादाविरोधात भारताने जशास तसे उत्तर दिले. पहेलगाममध्ये आतंकवाद्यांनी केलेल्या हल्याचा बदला भारताने ऑपरेशन सिंदुर मधून घेतला. भारताच्या या कारवाईमुळे जगातील देशही भारताच्या बाजूने होते. युध्दाच्या वेळी भारताने पाकिस्तानच्या नागरी वस्त्या किंवा लष्कर लक्ष्य न करता पाकिस्तानला नेस्तनाबूत केले. पाकिस्तानचे ड्रोन व मिसाईल हल्ले भारताने परतवून लावले, असेही श्री देवधर यांनी सांगितले.






अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

पाकिस्तानची सर्वच बाजुने कोंडी झाल्यानंतर पाकिस्तानच्या विनंतीवरुन भारताने युध्द थांबविले. माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान असा नारा दिला होता, तर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यात जय विज्ञान हा नारा आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जय अनुसंधान असा नारा त्यात जोडला. माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यामुळे शस्त्रास्त्र तंत्रज्ञानात भारताने केलेल्या मोठ्या प्रगतीमुळे भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांना जगात मागणी होत आहे. अत्याधुनिक पध्दतीची शस्त्रास्त्रे भारतीय तंत्रज्ञानाव्दारे आज निर्माण होत आहेत. २०४७ पर्यंत प्रत्येक क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होईल असेही ते म्हणाले.

आत्मनिर्भर भारताचं स्वप्न पूर्ण करा – कुलगुरू

भारताला आयात अधिक करावी लागत असल्याने आपण आत्मनिर्भर अथवा स्वावलंबी झालो पाहिजे ही संकल्पना पुढे आली. निर्यात कमी आणि आयात जास्त, त्यावर उपाय म्हणून आत्मनिर्भर भारत हा मंत्र केंद्र शासनाने देशाला दिला. स्वावलंबी असणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी तरुण विद्यार्थी, विद्यार्थीनींनी आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठामध्ये नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ तसेच इन्क्युबेशन सेंटरव्दारे नवसंशोधकांना सिड फंड देण्यात येते. तरुण विद्यार्थी, विद्यार्थीनींनी आपल्यातील नवोपक्रमाच्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवाव्या. २०१५ मध्ये असलेले ५०० स्टार्टअप्स आज दोन लाखांवर गेले आहे. त्यातही ५० टक्के स्टार्टअप्स हे अमरावती व नागपूरमध्ये आहे. विशेषत: यामध्ये ग्रामीण तरुणांचा मोठा सहभाग आहे. विद्यापीठाकडून आयोजित करण्यात येणा–या नवोपक्रम प्रदर्शनीमध्ये सुध्दा बहुसंख्य विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असतात. गुजरात येथे झालेल्या रिसर्च कॉन्व्हेंशनमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्याला ॲनिमल सायन्समध्ये पहिला क्रमांक प्राप्त झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भारताचे आत्मनिर्भरतेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकेतून विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. व्याख्याते श्री काशिनाथ देवधर यांचा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू यांनी परिचय करुन दिला. अमर कतोरे या विद्यार्थ्याने देशभक्ती गीत सादर केले. सूत्रसंचालन श्री किनाके यांनी, तर आभार प्रा. अरविंद तट्टे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध प्राधिकारिणींचे सन्माननीय सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कु. मंजरी बहादुरे या विद्यार्थीनीने गायिलेल्या वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# विद्यापीठाचा भौतिकशास्त्र विभाग युडीआरएफ मध्ये प्रथम कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते विभाग प्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांचा सत्कार



सत्कार प्रसंग

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने युनिर्व्हसिटी डिपार्टमेन्ट रँकिंग फ्रेमवर्क अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल विद्यापीठात आयोजित माजी विद्यार्थी मेळावा कार्यक्रमामध्ये कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांचा सत्कार करण्यात आला.

राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठांतील विविध विभागांकडून संशोधनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर कार्यक्षम वापर करणे, कार्यपध्दतीत पारदर्शकता आणि जबाबदारी आणणे व एक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, यासाठी विद्यापीठांतर्गत विभागांना मानांकन देण्याचा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार राबविण्यात येतो. यामध्ये भौतिकशास्त्र विभागाने उल्लेखनिय कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकाविला. नुकत्याच झालेल्या माजी विद्यार्थी मेळाव्यामध्ये भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे तसेच विभागातील अध्यापक सहका–यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी भौतिकशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. एस. के. ओमनवार उपस्थित होते.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी भौतिकशास्त्र विभागाने विद्यापीठाच्या नावलौकिकात मोलाची भर घातल्याबद्दल समाधान व्यक्त करुन भविष्यात अशीच उल्लेखनीय कामगिरी करण्याचे आवाहन केले. तर डॉ. संदीप वाघुळे यांनी विद्यापीठ प्रशासन, अध्यापन व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य व पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाल्याचे सांगून सर्वांचे आभार मानले.

# काया वाचा मने’ कादंबरी अंतर्मनातील संघर्षांचे आणि सामाजिक वास्तवाचे प्रामाणिक भाष्य - प्रा.डॉ. माधव पुटवाड
## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्ताने विद्यापीठात चर्चासत्र संपन्न




साहित्य हे केवळ कथानक सांगण्याचे माध्यम नसून, ते माणसाच्या ‘काया, वाचा आणि मन’ या त्रिसूत्रीचे सखोल आत्मपरीक्षण असते. ‘काया वाचा मने’ ही कादंबरी माणसाच्या देहबद्ध अस्तित्वापासून मानसिक आंदोलनापर्यंतचा प्रवास उलगडते आणि म्हणूनच ती केवळ वाचली जात नाही, तर विचार करायला भाग पाडते, असे मार्मिक विवेचन प्रा.डॉ. माधव पुटवाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा – २०२६ निमित्त ‘काया वाचा मने’ या कादंबरीवर आयोजित चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

पुढे बोलताना प्रा.डॉ. पुटवाड यांनी कादंबरीच्या आशयविश्वाचा सखोल वेध घेतला. त्यांनी सांगितले की, ‘काया वाचा मने’ ही कादंबरी व्यक्ती आणि समाज यांच्यातील संघर्ष, नैतिक द्वंद्व, मूल्यांची घसरण आणि माणसाच्या अंतर्मनातील अस्वस्थता यांचे प्रभावी चित्रण करते. साहित्य असो वा कोणताही विचारप्रवाह तो कधीच अंतिम नसतो. अंतिम सत्याचा दावा करणारा विचार हा मुळातच स्थैर्य गमावलेला असतो आणि म्हणूनच तो प्रश्नांकित होण्याच्या भीतीने दैववादी चौकटीत अडकतो. अशा दैववादी दृष्टिकोनाला नाकारण्याचे धाडस करणे हे सोपे नसते; कारण ते माणसाच्या सुरक्षिततेच्या भावनेला धक्का देणारे असते. मात्र ‘काया वाचा मने’ या कादंबरीत लेखकाने हे धाडस केले आणि म्हणूनच ही कादंबरी वैचारिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.

या चर्चासत्राचे प्रमुख अतिथी आणि कादंबरीकार श्री. सुनील यावलीकर यांनी कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेविषयी सविस्तर भूमिका मांडली. समाजात दिसणाऱ्या विसंगती, माणसाच्या मनातील ताणतणाव आणि व्यक्तीच्या नैतिक संघर्षांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न या कादंबरीत केल्याचे त्यांनी सांगितले. साहित्य हे प्रश्न विचारण्यासाठी असते, उत्तरे देण्यासाठी नव्हे, असे सांगत त्यांनी वाचकाला अस्वस्थ करणारे साहित्यच दीर्घकाळ टिकते, ही भूमिका अधोरेखित केली.

प्रा. डॉ. मोना चिमोटे यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर अशा चर्चासत्रांचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक महत्त्व विषद केले. मराठी साहित्याचा अभ्यास हा केवळ अभ्यासक्रमाचा भाग न राहता समाजाशी जोडलेला असावा, असे त्यांनी नमूद केले. संशोधक आणि विद्यार्थ्यांनी साहित्याकडे केवळ भावनिक नव्हे तर चिकित्सक दृष्टीने पाहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

चर्चासत्रात सहभागी वक्त्यांनी कादंबरीचे विविध अंगांनी विश्लेषण केले. प्रसिद्ध समीक्षक श्री. दा. गो. काळे यांनी 'काया वाचा मने' या कादंबरीचे मराठी कादंबरी परंपरेतील स्थान अधोरेखित केले. ही कादंबरी म्हणजे समाजाचा कळवळा म्हणून प्रेरित झालेल्या नायकाची गोष्ट आहे. तो संघटनेत त्याच आत्मीयतेने आपलं काम करतो. ही सामाजिक संरचना त्याला मुळापासून बदलायची असते ; परंतु त्यात आलेल्या अनुभवांनी तो ढासळतो. तो संवेदनशील आहे. या गोष्टी तो सजगतेने पाहतो. एका व्यवस्थेचा सामना करताना आपल्यातच एका वेगळ्या व्यवस्थेचा जन्म नकळत होतो. त्यातला शिक्षक हा सजग आहे. तो हा संघर्ष सूक्ष्मपणे टिपत जातो. त्यासाठी आपल्या ज्ञानाची व ज्ञानदानाची सगळी इंद्रियं जागृत ठेवत 'काया वाचा मनाने' ही सगळी व्यवस्था अनुभवत असतो. त्या अनुभवाचा दस्तऐवज म्हणजे ही कादंबरी आहे.

डॉ. प्रणव कोलते यांनी कादंबरीच्या भाषाशैली, निवेदनतंत्र आणि आशय–रचना यांची सखोल अभ्यासपूर्ण मांडणी केली. कादंबरीतील भाषा ही सहज, संवादप्रधान असतानाच अंतर्मुख करणारी असल्याचे त्यांनी सांगितले. वास्तववादी कथन आणि मानसिक विश्लेषण यांचा साधलेला समतोल ही या कादंबरीची महत्त्वाची ताकद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. भगवान फाळके यांनी 'काया वाचा मने' या कादंबरीची केवळ प्रशंसात्मक नव्हे, तर अत्यंत परखड आणि चिकित्सक समीक्षा केली. दिनकर या नायकाने चळवळ का सोडली याचे स्पष्टीकरण देणारी 'काया वाचा मने ' ही कादंबरी आहे. ही कादंबरी सामान्य वाचकाना सामाजिक चळवळीविषयी निराशा वा नकारात्मक दृष्किोन देते . सामाजिक कार्यकर्त्यांना व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील संतुलन साधण्यासाठी मार्गदर्शक ठरते तर आत्मकेंद्री व समाजविन्मुख जीवन जगणाऱ्यांना सामाजिक चळवळींवर टिका करण्यासाठी कोलित देते. कादंबरीतील नायकाचे बरेचसे चिंतन अत्यंत सामान्य स्वरूपाचे आहे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

या चर्चासत्राचे प्रास्तविक व सूत्रसंचालन प्रा. अभिजित इंगळे यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रा. सारिका वनवे यांनी केले. या चर्चासत्रासाठी शिक्षण व साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांसह प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पदव्युत्तर मराठी विभागातील उमाशंकर ठाकूर, अंशदायी शिक्षक, संशोधक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने आयोजित हे चर्चासत्र मराठी साहित्याची समज, अभ्यास आणि सामाजिक भान यांना नवी दिशा देणारे ठरले, अशी भावना उपस्थित साहित्यप्रेमींनी व्यक्त केली.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्याने विद्यापीठात विद्यार्थ्यांचे कविसंमेलन

## मराठी भाषा ही विकास,विचार आणि परिवर्तनाचे माध्यम व्हावे - डॉ. मोना चिमोटे



''मराठी भाषा ही केवळ भावनिक अभिमानाची किंवा संवादापुरती मर्यादित न राहता ज्ञाननिर्मिती, सामाजिक परिवर्तन आणि विकासाचे प्रभावी माध्यम बनली पाहिजे. कवितेमध्ये माणसाच्या अंतर्मनातील भाव, समाजातील अस्वस्थता आणि परिवर्तनाची आस व्यक्त करण्याची ताकद असते. कवी आपल्या शब्दांमधून समाजाची चेतना जागृत करू शकतो'', असे प्रतिपादन अधिष्ठाता प्रा. डॉ. मोना चिमोटे यांनी केले. त्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथील पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' अंतर्गत कविसंमेलनात अध्यक्ष म्हणून बोलत होत्या.

अध्यक्षीय मार्गदर्शनात पुढे बोलताना डॉ. चिमोटे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी केवळ कविता लिहिण्यावरच थांबू नये, तर संत साहित्यातील काव्य आणि विविध भाषांतील कवितांचे वाचन करावे. मराठी साहित्यपरंपरेतील विविध आकृतिबंध, काव्यप्रकार आणि शैली यांचे वेगळेपण समजून घ्यावे. स्वतःचे अनुभव केवळ थेट मांडण्याऐवजी प्रतिमा, प्रतीक आणि सूचक भाषेतून व्यक्त करण्याची सवय लावावी. बहुभाषिकता ही मराठीच्या विरोधात नसून ती भाषिक समृद्धीची प्रक्रिया आहे; त्यामुळे भाषांवर प्रभुत्व मिळवण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावा, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पदव्युत्तर मराठी विभागाचे प्रा. डॉ. माधव पुटवाड यांनी केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा भाग नसून तो विद्यार्थ्यांच्या सर्जनशील क्षमतेला व्यासपीठ देणारा उपक्रम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कविसंमेलनासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा साहित्याशी थेट संवाद वाढतो आणि नवोदित लेखकांना आत्मविश्वास मिळतो, असे त्यांनी सांगितले.

या कविसंमेलनात साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. ज्येष्ठ कवी अनंत नांदुरकर यांनी आपल्या गझल सादरीकरणातून सभागृहाला मंत्रमुग्ध केले. कविता करण्यासाठी भाषेचे सखोल ज्ञान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच भाषेवर प्रेम असणेही महत्त्वाचे असल्याचे त्यांनी आपल्या अनुभवातून सांगितले. कवी नितीन भट यांनी कविता आकाराने लहान असली तरी तिचा प्रभाव जनमानसावर खोलवर उमटतो, असे मत व्यक्त करत विविध नामवंत कवींच्या कवितांचे दाखले दिलेत.

ज्येष्ठ पत्रकार माधव पांडे यांनी आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात साहित्यिकांनी डिजिटल माध्यमांचा सकारात्मक आणि सर्जनशील वापर करण्याचे कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. तसेच सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि नव्या वाचनसंस्कृतीच्या पार्श्वभूमीवर कवी आणि साहित्यिकांची भूमिका बदलत चालल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, 'ट्रेंड' आणि 'व्ह्यूज'च्या स्पर्धेत कवीचा प्रभाव हळूहळू कमी होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा. डॉ. हेमंत खडके यांनी कवितेतील विचार हा भावपूर्ण, सौंदर्यपूर्ण आणि आशयघन असावा, असे सांगितले. कवितेतील शब्दांचा नाद, आशयाची तीव्रता आणि कवीचे सादरीकरण या घटकांतूनच कविता रसिकांपर्यंत पोहोचते, असे त्यांनी नमूद केले.

या कविसंमेलनात विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यात रोशन नकाशे, कु. भाविका मनोहर, कु. तेजस्विनी टारपे, कु. पूज्यनी गायकवाड, कु. संध्या काळे, सुमित अग्रवाल, कु. सारिका वनवे, अभिजित इंगळे, सचिन अवचार, कु. प्रणाली भिलंगे, तेजस भागवत, कु. नेहा राठोड, कु. रुचिता निकम, कु. अपेक्षा निमकर्डे, कु.साक्षी धुळे वऋषिकेश पाडरआदी नवोदित कवींनी स्वरचित कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली. सामाजिक भान, समकालीन राजकीय प्रश्न, कौटुंबिक नातेसंबंध आणि प्रेम यांसारख्या विषयांवरील कवितांनी संमेलनाला वैचारिक आणि भावनिक उंची प्राप्त करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उस्फुर्त व प्रभावी पद्धतीने मराठी विभागाचे विद्यार्थी ऋषिकेश पाडर आणि साक्षी धुळे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा.अभिजित इंगळे यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. माधव पुटवाड यांच्यासह अंशदायी शिक्षक, संशोधक विद्यार्थी, विभागातील कर्मचारी श्री. उमाशंकर ठाकूर तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील प्राध्यापक, अंशदायी शिक्षक, संशोधक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले

## विद्यापीठात
## मी ज्योतिराव फुले बोलतोय एकपात्री नाटकाचे सदरीकरण



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या प्रांगणात महात्मा ज्योतिबा फुले व्याख्यानमाला अंतर्गत 'मी ज्योतिराव फुले बोलतोय!' या एकपात्री नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. अमरावती येथील सुप्रसिध्द कलाकार सुशील दत्त ऊर्फ सुशीला ऋषी बागडे यांनी आपल्या सादरीकरणातून महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंग, स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य, सामाजिक विषमतेविरुध्दचा संघर्ष व क्रांतिकारी विचार प्रभावीपणे साकारले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. के. यू. राऊत उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातून डॉ. के. बी. नायक यांनी महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील सामाजिक उपयुक्तता स्पष्ट करत अशा वैचारिक व सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व सांगितले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रशांत भगत यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. रोहिणी देशमुख, तर आभार डॉ. के. यू. राऊत यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा सेमिनार स्पर्धा संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा 'स्त्रियांविरुद्ध सायबर गुन्हे : स्वरूप व उपाय' या विषयावर सेमिनार स्पर्धा संपन्न झाली. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये स्त्रियांविरुद्ध घडणाऱ्या सायबर गुन्ह्यांबाबत जाणीव जागृती व्हावी, तसेच त्यावर उपायत्मक दृष्टीने त्यांनी अधिक कार्य करावे, या हेतूने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक स्पर्धकाने विषयाच्या अनुषंगाने संदर्भ देत मांडणी केली. त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आणि दोन प्रोत्साहनपर क्रमांक निवडण्यात आले.या स्पर्धेत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पल्लवी चिमूरकर यांनी प्रथम, गायत्री तळेकर यांनी द्वितीय, प्रफुल्ल कुकडे यांनी तृतीय, प्राजक्ता देशमुख यांनी प्रोत्साहनपर तर शिक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थी जय काळे यांनी प्रोत्साहनपर क्रमांक पटकाविला. या स्पर्धेचे परीक्षण राज्यशास्त्राच्या अभ्यासक डॉ. सपना रोंघे यांनी केले.क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे यांच्या हस्ते ग्रंथसंच भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विचारमंचावर डॉ. सपना रोंघे यांसह सेंटरचे प्रा. डॉ. भगवान फाळके उपस्थित होते.बक्षीस वितरणावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, आज समाजात झपाट्याने सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. ही एक चिंताजनक बाब आहे. वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा या दृष्टीने या पूर्वी महिलांमधील डिजिटल साक्षरता आणि महाविद्यालयीन मुलींमध्ये सायबर सुरक्षा विषयक जागृतीसंदर्भात कार्यक्रम घेण्यात आले. स्त्रियांच्या दृष्टीने सायबर सुरक्षा अतिशय संवेदनशील विषय आहे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताली अधिक जागृती करावी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक व आभार प्रदर्शन प्रा. पूजा अलोने यांनी केले.



# देशाचा सर्वांगीण विकास हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन - डॉ. विजय खरे
## विद्यापीठात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा' विषयावर व्याख्यान संपन्न



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचा सत्कार करतांना एकता रॅली आयोजन समितीचे पदाधिकारी

राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांना समान नागरिकत्व बहाल केले. राज्यघटनेमध्ये कलम ३५२, ३५६ आणि ३६० या कलमांचा अंतर्भाव करुन देश एकसंघ केला. कलम ३५६ देशाची अखंडता कायम ठेवते. राष्ट्राचा विचार करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचा सर्वांगीण विकास हा दृष्किोन ठेवला, असे प्रतिपादन पुणे येथील सावित्रीबाई


कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण मनोगत व्यक्त करतांना

फुले विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी


अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने स्व. श्री गोविंदाजी खोब्रागडे स्मृतिप्रित्यर्थ आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून गोंडवाणा विद्यापीठ, गडचिरोलीचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.



विषयाची मांडणी करतांना वक्ते डॉ. विजय खरे

डॉ. विजय खरे विषयाची मांडणी करतांना म्हणाले, जगावर अधिराज्य गाजविण्याच्या प्रयत्नातून जगात आज हल्ले होत आहेत. नौदल, भूमी, आकाश आपल्याच ताब्यात असले पाहिजे यासाठी प्रयत्न होत आहेत व त्यातूनच राष्ट्राच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. तिसरे महायुध्द जर झाले, तर त्याचा केंद्रबिंदू सुध्दा चीन आणि भारत असू शकतो, असा अंदाजही डॉ. खरे यांनी वर्तविला. डॉ. बाबासाहेबांना चौकटीत बांधून न ठेवता येणा–या पिढ्यांना आजच नव्या रुपाने सांगा, जेणेकरुन येणा–या पुढील पिढ्या आपला सन्मान करतील, असे आवाहन देखील त्यांनी याप्रसंगी केले.

प्रमुख अतिथी डॉ. अनिल हिरेखण म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाचा नवा पैलू आज व्याख्यातांनी मांडला. स्वातंत्र्यपूर्व काळात सरसेनापती ही पदवी होती, मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये ते येवू दिले नाही. लष्कर, नौदल, वायुदल हे तीनही वेगवेगळे ठेवून राष्ट्रपतींचे त्यांच्यावर नियंत्रण ठेवले आणि तीनही दलाचे प्रमुख सुध्दा आपल्या परिने निर्णय़ घेवू शकत नाहीत. एवढेच नाही, तर राष्ट्रपती सुध्दा संसदेच्या मान्यतेशिवाय निर्णय घेवू शकत नाही, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व हे अफाट आहे. एखादा ग्रंथ वाचावा आणि तो संपता संपत नाही, असे डॉ. बाबासाहेब सर्वव्यापी आहेत. संत गाडगे बाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एकमेकांशी जवळीक नाते होते. त्यामुळे या दोन्ही विभूतींच्या विचारांची सांगड घालून विद्यापीठामध्ये संविधान शिल्पाची उभारणी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांची राष्ट्राप्रती असलेली भावना आदींची पुनर्मांडणी झाली पाहिजे, जेणेकरुन येणा–या नवीन पिढ्यांना ते समजेल असेही कुलगुरू म्हणाले.

संत गाडगे बाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, मेणबत्ती प्रज्वलित करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी एकता रॅली समितीच्यावतीने कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन तर डॉ. आंबेडकर थॉटमध्ये आचार्य पदवी प्राप्त करणा–या वंदना धवणे यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड, सूत्रसंचालन डॉ. जगदीश गोवर्धन यांनी, तर आभार डॉ. गजानन सोडनर यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, डॉ. गजानन मुळे, डॉ. वैशाली धनविजय, प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, माजी परीक्षा नियंत्रक श्री. र. वाघमारे, श्री खोब्रागडे कुटुंबातील सदस्य, आंबेडकर चळवळीतील गणमान्य नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने व्याख्यान कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



व्याख्यान कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

# कर्मचाऱ्यांनी विद्यापीठासाठी कुटुंब समजून कार्य केले - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात सेवानिवृत्तप्रसंगी कर्मचाऱ्यांचा सत्कार



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते मार्गदर्शन करतांना

विद्यापीठातून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कष्टाने व निष्ठेने या विद्यापीठाचा वटवृक्ष बहरला आहे. त्यांची सेवा संपली असली, तरी त्यांचा स्नेह विद्यापीठासाठी कायम असून त्यांनी आपल्या सेवाकाळात विद्यापीठाकरीता कुटुंब समजून कार्य केले असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री सुरेंद्र गुल्हाने, श्री नरेंद्र खैरे, श्री संजय काळे तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, आजचा हा क्षण खूप भावनिक आहे. ज्याप्रमाणे जेवणात मीठ नसेल, तर मीठाची गरज भासते, त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांची उपस्थिती ही विद्यापीठासाठी महत्वाची आहे. कर्मचारी निवृत्त होत असतांना आम्हाला खंत वाटते, कारण त्यांचा अनुभव सुद्धा निवृत्त होत आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात या विद्यापीठाच्या विकासासाठी, सेवा देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. समाधानाने व आनंदाने निवृत्त होत असल्याच्या चांगल्या भावना त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितल्या. निश्चितच ही विद्यापीठासाठी पावती आहे. त्यांचे पाल्यही आज उच्च पदावर कार्यरत आहे, ही सुद्धा भाग्याची गोष्ट आहे. मनाची व नात्याची श्रीमंती सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने ठेवली आहे, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्यात. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सत्कारमूर्ती श्री सुरेंद्र गुल्हाने, श्री नरेंद्र खैरे व श्री संजय काळे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर सौ. गुल्हाने, सौ. खैरे व सौ. काळे यांचा सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. मनिषा कुऱ्हेकर व सौ. स्मिता म्हैसाळकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.



प्रमुख अतिथी डॉ. हेमंत देशमुख विचार व्यक्त करतांना

प्रमुख अतिथी डॉ. हेमंत देशमुख म्हणाले, कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात जे कार्य केले व परिश्रम घेतलेत, त्यामुळेच विद्यापीठाचा नावलौकिक जागतिक पातळीवर पोहोचला आहे. मी परीक्षा संचालक असतांना कर्मचारी किती जबाबदारीने व वेळेत काम करतात, हे मी जवळून पाहिले आहे, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवले सुद्धा आहे. सेवानिवृत्त कर्मचायांनी आपल्या आयुष्याची तीस-चाळीस वर्षे या विद्यापीठाला दिली आहेत. त्यांचा सत्कार हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा असून त्यांचे नातेवाईक सुद्धा यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना भावी आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्कारमूर्ती श्री सुरेंद्र गुल्हाने, श्री नरेंद्र खैरे व श्री संजय काळे यांनी मनोगतातून आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच डॉ. नितीन कोळी, श्री मंगेश वरखेडे व विद्यापीठ कर्मचारी संघाचे श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे,उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव डॉ. श्रीकांत तायडे व कोषाध्यक्ष श्री राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार भांडार विभागाचे डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. श्री सुरेंद्र गुल्हाने यांचा त्यांच्या नातेवाईकांकडून सुद्धा याप्रसंगी सहर्ष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, कर्मचारी संघाचे माजी अध्यक्ष श्री भैय्यासाहेब भारंबे, माजी सचिव श्री विलास सातपुते, श्री अशोक धाबे यांचेसह विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते



श्री सुरेंद्र गुल्हाने यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री नरेंद्र खैरे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री संजय काळे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

# अ.भा. आंतर विद्यापीठ फुटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

युनिर्व्हसिटी ऑफ कॅलकटा, कोलकाता येथे ३० जानेवारी ते ०९ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फुटबॉल (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाचा ऋतिक अतकर, प्रज्योत तायडे व ओम काशीकर, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा राज मिश्रा, दुकीवाकोर ही, ओमा हँग सुब्बा, झाकीएएसातुओ केट्स, राहुल कुमार, पल्डेन धोंडुप, अफर्मिंग त्लांग व सोनम तमंग, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा मोर्विन मोसेस, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा साहिल बेनिवाले व सुफियान अब्दुल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा ओम धारव व मुस्तफा शेख, इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांवचा अभिषेक बुटके व यश यादव, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा रोमान खान आणि श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा रफिक ए. खान याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. पुरुष व महिला चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे १६ ते २४ व २७ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आयोजित व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे ०१ ते ०५ फेब्रुवारी, २०२६ रोजी होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये भारतीय महाविद्यालय, अमरावतीचा ऋत्विक कुडवे, रोहीत सहारे व आकाश सोळंके, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जीचा ओम सोळंके व दिपेश वानखडे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा रोहण शेळके, रोहण पोटे, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा अनिकेत चोरे, युवाशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा करण सुपेकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा रोहण थोपडे, अंशुमन डोकरे व निलेश कोचे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा प्रथमेश थोरकर, अजय मळेकर, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळचा भाकित मेश्राम, कुणाल लोणारे, रोहीत मेश्राम व यश विरुळकर, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगांवचा सर्वेश इंझळकर, रामक्रिष्ण महाविद्यालय, दर्यापूरचा प्रशिक गवई आणि श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा मोहीत भिसे याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे २२ ते २५ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

सौराष्ट्र युनिर्व्हसिटी, राजकोट येथे २२ ते २६ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हँडबॉल (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाची कु. शितल गावंडे व कु. साक्षी वानखडे, आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वेची कु. अर्पिता वाघमारे, कु. उज्वला कोटनके व कु. खुशी ठवरे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. रिनचेन डोलमा, कु. अनिता चिमोटे, कु. नंदिनी पंदराम व कु. दिपाली, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची कु. साक्षी माटोडे, श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वेची कु. कशीश करसे व कु. सलोनी यादव, इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगांवची कु. नंदिनी भगत व कु. तनू काकडे, इंदिरा महाविद्यालय, कळंबची कु. राधिका राऊत, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराची कु. राणी सोलंकी, प्रो. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेराची कु. साक्षी सुरजुसे, स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालय, धामणगांव रेल्वेची कु. साक्षी राठोड आणि सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीची कु. वैदेही अजबाळे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे १० ते १९ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

भूपाल नोब्लेस युनिर्व्हसिटी, उदयपूर येथे ०३ ते ०६ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा युवराज सिंह, रोमित उरम, अजिंक्य नवाथे, इशान भट्टड, धीरज चव्हाण व प्रज्वल पिडेकर, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा प्रथमेश घरडे, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा प्रज्वल लकडे व सुमित चव्हाण, एस.के.एन.गोयनका महाविद्यालय, कारंजा लाडचा साहील चौधरी व रिजवान चौधरी, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा कृष्णा वानखडे, नेहरू महाविद्यालय, नेर परसोपंतचा महेश लाखे, तक्षशिला महाविद्यालय, अमरावतीचा अंकुश चिमोटे, विनायक विद्यामंदिर, अमरावतीचा राहुल जाधव आणि सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा आदित्य भोरल याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे २२ ते ३१ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आयोजित व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे ०६ ते १० फेब्रुवारी, २०२६ रोजी होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची कु. वैष्णवी गिरी व कु. रोहिणी इसळकर, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची कु. क्षितिजा आठवले, कु. पल्लवी सदांशिव, कु. पल्लवी कोल्हे व कु. तेजस्विनी गुल्हाने, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची कु. आकांक्षा वाघमारे, भारतीय महाविद्यालय, अमरावतीची कु. दिपाली ढोले व कु. तेजस्विनी गुळदे, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जीची कु. साक्षी वानखडे, कु. अर्पिता गायगोले व कु. नितू नेमाडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. राधिका सिकची, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची कु. सलोनी तसरे, विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची कु. राधिका दानखडे, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळची कु. मृणाल फुसाटे, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूरची कु. पल्लवी जाधव, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीची कु. तन्वी देशमुख, सरस्वती महाविद्यालय, दहिहांडाची कु. रिया डांगरे, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड मॅनेजमेंट, बडनेराची कु. गार्गी उगले आणि श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. नितल जुनघरे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे २८ जानेवारी ते ०४ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# अ.भा. आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक येथे १५ फेब्रुवारी, २०२६ रोजी होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीचा आकाश बरवाल, वैभव बंदे व गौरव भारड, डॉ. एस. मुखर्जी महाविद्यालय, शेंदुरजनाघाटचा पियुष मसने व प्रज्वल हरले, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराचा प्रतिक गेडाम व नितीन हिवराळे, डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातुरचा करण चव्हाण आणि श्रीमती नरसम्मा महाविद्यालय, किरणनगर, अमरावतीचा मुकेश उईके याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे ०३ ते १२ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.



# विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती (युवक दिन) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विभागाच्यावतीने जेन–झेड (नवीन पिढी) या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के.बी. नायक, तर डॉ. के. यू. राऊत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

स्वामी विवेकानंद यांच्या विचारांतून युवकांनी आत्मविश्वास, चारित्र्य, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी संशोधक विद्यार्थी रमेश पवार याने राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्रा. साधना इंगोले यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या कार्याचा उल्लेख करताना सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, पंडिता रमाबाई, अहिल्याबाई होळकर यांसारख्या समाजसुधारक महिलांनी समाज परिवर्तनात बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला.

वादविवाद स्पर्धेत एम.ए. भाग २ ची विद्यार्थीनी कु. गायत्री खरबडे हिने जेन–झेड पिढीची सकारात्मक बाजू मांडताना ही पिढी तंत्रज्ञानस्नेही, जागरुक, नवविचार व बदल स्वीकारणारी असल्याचे नमूद केले. एम.ए.भाग–१ ची विद्यार्थीनी कु. निर्मल काळे हिने जेन–झेड च्या नकारात्मक बाजू मांडताना सोशल मीडियावर अवलंबित्व, ताणतणाव, संयमाचा अभाव व पारंपरिक मूल्यांपासून दुरावा यावर भाष्य केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. के. बी. नायक म्हणाले, जेन–झेड ही संधी आणि आव्हाने घेऊन आलेली पिढी असून योग्य मार्गदर्शन, मूल्यशिक्षण व विवेकनिष्ठ विचारांची जोड दिल्यास ही पिढी समाजपरिवर्तनात मोलाची भूमिका बजावू शकते. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा वारसा युवकांनी आत्मसात करावा, असे आवाहन त्यांनी केले. संचालन डॉ. प्रशांत भगत, तर आभार कु. गायत्री खरबडे मानले. कार्यक्रमाला डॉ.रोहिणी देशमुख, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, डॉ.रोहिणी वावरे, रमेश पवार, गोपाल वानखडे, प्रवीण घर्डीनकर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठात राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अतिथी गृह येथे वैदर्भीय कन्या राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे, उपकुलसचिव (मागासवर्गीय कक्ष) डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव (गोपनीय) डॉ. विरेंद्र निमजे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, महासचिव श्री नरेंद्र घाटोळ, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात स्वामी विवेकानंद जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्रात युवकांचे प्रेरणास्त्रोत स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवक दिन म्हणून मोठ्ष्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन तसेच स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल माहिती स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. योगेश्वर कुरवाडे यांनी दिली.





# विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात नेताजी सुभाषचंद्र बोस व वं. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात थोर स्वातंत्र्य सैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस तसेच वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. के. यू. राऊत होते.

यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची देशभक्ती, शौर्य, बलिदान तसेच वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमानिमित्त विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'भारतातील सामाजिक समस्या' या विषयावर आधारित पोस्टर प्रदर्शन व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टरमधून बेरोजगारी, दारिद्र्य, जातीय भेदभाव, स्त्री–पुरुष समानता, शिक्षण व आरोग्य अशा विविध सामाजिक समस्यांचे प्रभावी सादरीकरण केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. के. बी. नायक यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची राष्ट्रनिष्ठा आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या सामाजिक जाणिवेचा आदर्श घेऊन संशोधन व समाजोपयोगी कार्यात योगदान देण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन करुन प्रसिध्द अभिजात जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांच्या समाजशास्त्रीय सिध्दांताचा दाखला देत नेताजी सुभाष चंद्र बोस व वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा लोकविलक्षण व्यक्तिमत्व असलेला नोता नामोल्लेख केला. कार्यक्रमाची सुरुवात नेताजी सुभाषचंद्र बोस व वं.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण व विद्यापीठ गीताने झाली. याप्रसंगी विभागातील डॉ.रोहिणी देशमुख, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, डॉ. प्रशांत भगत, संशोधक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री प्रवीण घर्डीणकर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव श्री अनिल मेश्राम, सहा. कुलसचिव श्री मिलींद देशपांडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

दिव्य मराठी

विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची मतिमंद मुलांच्या शाळेला भेट

# मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाने पुढाकार घ्यावा : के.बी. नायक

प्रतिनिधी | अमरावती

मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनासोबतच समाजानेही सक्रीय भूमिका घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. के. बी. नायक यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून अमरावती शहरातील निवासी मतिमंद मुलांच्या शाळेला भेट दिली. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

डॉ. नायक यांनी मतिमंद मुलांसाठी विशेष योजना राबविण्याची आवश्यकता असून त्यांच्या शिक्षण, आरोग्य, पुनर्वसनासाठी अधिक व्यापक धोरणांची अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे नमूद केले. तसेच मतिमंद मुलांच्या विविध समस्यांसंदर्भात संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवून विद्यापीठ स्तरावर संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे . त्या माध्यमातून मतिमंद मुलांच्या विकासाकरिता नवीन संधी उपलब्ध करून देता येतील, जेणेकरुन अशा विद्यार्थ्यांना समाजामध्ये प्रतिष्ठेने जीवन जगण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.



विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची मतिमंद मुलांच्या शाळेला भेट दिली.

शाळेचे मुख्याध्यापक उमेश धुमाळे यांनी मतिमंद मुलांना भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक, मानसिक व सामाजिक समस्यांची माहिती उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना दिली. तसेच शाळेतील अध्यापकांनी वस्तीगृह व शाळेमधील सुविधांची माहिती दिली. शाळा व्यवस्थापनाने या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले. संचालन संशोधक विद्यार्थीनी निर्मल काळबांडे, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. याप्रसंगी समाजशास्त्र विभागातील डॉ.के.यु. राऊत, डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, संशोधक विद्यार्थी राजकुमार सरयाम, रमेश पवार, गोपाल वानखडे, शिक्षकेत्तर कर्मचारी प्रवीण गडलीनकर, प्रतिष्ठित नागरिक व समाजसेवक नारायण पवार तसेच शिक्षकवृंद अनिल बाळके, श्रध्दा काळबांडे, प्रेरणा बाहे, निखिल बारबुध्दे, विशाल शिवाने, मुकुंद बडगे, अजय कराड उपस्थित होते.

## मतिमंद विद्यार्थ्यांसमवेत खेळ

यावेळी विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतिमंद विद्यार्थ्यांसोबत नृत्य, गाणे यासारखे मनोरंजनात्मक उपक्रम राबवून शाळेतील मुलांचा आनंद द्विगुणित केला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना फळ व खाऊचे वाटप करण्यात आले. ही शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणीव वाढविणारी व मतिमंद मुलांच्या जीवनातील अडचणी समजून घेण्यास उपयुक्त ठरली.

# सुभाषचंद्र बोस और बालासाहेब ठाकरे को किया अभिवादन



भास्कर डेस्क | अमरावती. संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय में देश के महान स्वतंत्रता सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस तथा हिंदुहृदयसम्राट बालासाहेब ठाकरे की जयंती मनाई गई। इस अवसर पर विश्वविद्यालय परिवार की ओर से दोनों महापुरुषों को भावपूर्ण श्रद्धांजलि अर्पित की गई। कार्यक्रम की शुरुआत विवि के कुलगुरु डॉ. मिलिंद बराहाते द्वारा नेताजी सुभाषचंद्र बोस एवं बालासाहेब ठाकरे की प्रतिमा का पूजन व पुष्पार्पण कर हुई। उन्होंने अपने संक्षिप्त संबोधन में कहा कि नेताजी का राष्ट्रप्रेम, त्याग और बलिदान तथा बालासाहेब ठाकरे का समाज और राष्ट्र के प्रति स्पष्ट एवं निर्भिक नेतृत्व आज की पीढ़ी के लिए प्रेरणास्त्रोत है। कार्यक्रम में नवोपक्रम, नवसंशोधन एवं साहचर्य मंडल के संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन एवं विस्तार विभाग के संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, सहायक कुलसचिव श्री अनिल मेश्राम, सहायक कुलसचिव श्री मिलिंद देशपांडे सहित विश्वविद्यालय के अधिकारी एवं कर्मचारी बड़ी संख्या में उपस्थित थे। कार्यक्रम का संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर ने किया।

वृत्त केसरी

# विद्यार्थ्यांनी जिजाऊ व स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा आदर्श घ्यावा

■ अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांचे प्रतिपादन ■ विद्यापीठात वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन थाटात



**प्रतिनिधी/वृत्त केसरी**

**अमरावती, १२ जानेवारी :** महापुरुषांचे विचार नवीन पिढीला दिशादर्शक असतात. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचार व कार्यापासून विद्यार्थ्यांनी आदर्श घेवून आपल्यातील कला, कौशल्य व व्यक्तीमत्व विकसित करावे, असे प्रतिपादन मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांनी केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर हकश्राव्य सभागृहात करण्यात आले, उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजक तथा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ. मोना चिमोटे यांनी केली. त्या पुढे म्हणाल्या, स्वराज्य प्रस्थापित करण्यासाठी राजमाता जिजाऊ यांनी शिवरायांसारखा महान सुपूत्र घडविला. सर्वगुण संपन्न शिवराय आज आम्हां सर्वांचे आदर्श आहेत. महाराजांना राजमाता जिजाऊंनी सर्व कौशल्ये व विद्यांमध्ये पारंगत केले. त्यांनी आपल्या राज्यकारभारात स्त्रियांचा सन्मान केला, त्यांना समान संधी दिली. राष्ट्रीय युवादिनानिमित्त स्वामी विवेकानंद यांचे स्मरण जयंतीप्रसंगी होत आहे. स्वामी विवेकानंद यांनी दिलेले विचार हे युवकांसाठी प्रभावी असून त्यातूनच युवक बलशाली होवू शकतो. विद्यार्थ्यांमधील कलागुण व व्यक्तीमत्व विकसित व्हावे, याहेतूने आयोजित वक्तृत्व स्पर्धा निश्चितच विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार असून आपल्यातील उपयुक्तता या स्पर्धेच्या निमित्ताने युवक सिद्ध करतील, असे सांगून त्यांनी जयंतीदिनाच्या शुभेच्छा दिल्यात. प्रमुख अतिथी डॉ. नितीन कोळी म्हणाले, सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे, हा उपदेश राजमाता जिजाऊ यांनी दिला. त्यांनी राज्य कारभार करतांना सर्वांना समानतेची वागणूक दिली. सर्व जाती-धर्म-पंथांच्या लोकांना समान मानले आणि म्हणूनच शिवाजी महाराज इतिहास घडवू शकले, आदर्श राजा झाले आणि त्यांचा आदर्श आजही आम्हाला प्रेरणा देत आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीप्रसंगी 'जिजाऊ लेक' हा पुरस्कार देवून महिलांचा सन्मान केल्या जातो, ही खरोखरच गौरवास्पद बाब आहे. याप्रसंगी त्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

प्रास्ताविकतेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी वक्तृत्व स्पर्धा आयोजनामागील भूमिका विषद केली. वक्तृत्व स्पर्धेकरीता असलेले परीक्षक डॉ. वैभव म्हस्के, प्रा. अभिजित इंगळे, प्रा. पुजा अलोणे, डॉ. मनिषा इंगलकर, श्री प्रफुल्ल कुबडे तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. संचालन प्रा. आदित्य पुंड तर आभार प्रा. अनघा देशमुख यांनी मानले. प्रा. रोहिणी वावरे यांनी डॉ. स्वाती शेरेकर यांचा परिचय करुन दिला.

### 'जिजाऊ लेक' पुरस्काराने डॉ. स्वाती शेरेकर सन्मानित

इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर यांचा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे यावर्षी 'जिजाऊ लेक' हा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी व अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांनी गौरव प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून त्यांना सन्मानित केले.

प्रतिदिन अखबार

# आहार प्रदर्शनी को नागरिकों का उत्स्फूर्त प्रतिसाद




## विश्वविद्यालय के गृह विज्ञान विभाग एवं जेनिथ हॉस्पिटल का संयुक्त आयोजन

**अमरावती, ९ जनवरी-** संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के गृह विज्ञान विभाग एवं अमरावती शहर के प्रसिद्ध जेनिथ हॉस्पिटल के संयुक्त तत्वावधान में श्री छत्रपति शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज में हृदय रोगों से संबंधित स्वास्थ्य कार्यक्रम के अंतर्गत आयोजित आहार प्रदर्शनी को नागरिकों का उत्साहपूर्ण प्रतिसाद मिला.प्रदर्शनी में गृह विज्ञान विभाग की छात्राओं ने आहार से संबंधित विभिन्न मॉडल एवं पोस्टरों के माध्यम से नागरिकों को जागरूक किया. हृदय रोगियों को कौन-से खाद्य पदार्थ सेवन करने चाहिए और किन से परहेज करना चाहिए, इसकी जानकारी दी गई. प्रोसेस्ड फूड, मैदे से बने पदार्थ बिस्किट, शीतपेय, अधिक नमक व शक्कर के दुष्परिणामों के बारे में प्रभावी रूप से समझाया गया.इसके साथ ही प्रोटीन, फाइबर युक्त आहार, दालें, फल, हरी सब्जियां एवं अनाज के सेवन से हृदय एवं स्वास्थ्य पर होने वाले सकारात्मक प्रभावों को प्रत्यक्ष मॉडलों द्वारा दर्शाया गया. तले हुए पदार्थ, फास्ट फूड, जंक फूड एवं प्रोसेस्ड मांस के अत्यधिक सेवन से होने वाले नुकसान, फूड पिरामिड का महत्व तथा संतुलित आहार अपनाने के विषय में मार्गदर्शन किया गया.इस प्रदर्शनी को किशोरों से लेकर वरिष्ठ नागरिकों तक ने बड़ी संख्या में देखा. कार्यक्रम को गृह विज्ञान विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय का मार्गदर्शन प्राप्त हुआ. प्रदर्शनी की सफलता के लिए विभाग के शिक्षक आयतल कामदार, भक्ति सोंदिया, सुमेध वडूरकर तथा जेनिथ हॉस्पिटल की आहार विशेषज्ञ काजल केशवानी, किरण ठाकरे एवं समृद्धि वानखडे का विशेष सहयोग रहा.

लोकशाही वार्ता

# तीन विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**लोकशाही वार्ता/अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एम.बी.ए.) विभागाच्या तीन विद्यार्थिनी मोहिनी संजय राऊत, कु. नेहा गजानन वासू आणि कु. हर्षाली शरद पाचगडे यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. समर्पित अभ्यास, शिस्तबध्द जीवन शैली आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर या विद्यार्थीनींनी हे यश संपादन केले आहे. कु. मोहिनी राऊत ही इन्फ्रिजी डेट इंजिनिअर्स इंडिया प्रा.लि., अमरावती येथे एक्झिक्युटिव्ह अकाऊंटंट म्हणून, कु. नेहा वासू ही ई.एस.ए.एफ. स्मॉल फायनान्स बँक लि. येथे सेल्स एक्झिक्युटिव्ह, तर कु. हर्षाली पाचगडे ही डव्ह गारमेंट्स प्रा.लि., अमरावती येथे सेल्स एक्झि क्युटिव्ह म्हणून कार्यरत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच एम.बी.ए. विभाग प्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

प्रतिदिन अखबार

# एमबीए की 3 छात्राएं विद्यापीठ की गुणवत्ता सूची में

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 8 जनवरी- संगाबा अमरावती विद्यापीठ के मास्टर ऑफ बिजनेस एडमिनिस्ट्रेशन (एमबीए) विभाग की 3 छात्राएं मोहिनी संजय राऊत, नेहा गजानन वासु और हर्षाली शरद पाचगडे ने विद्यापीठ की गुणवत्ता सूची में स्थान प्राप्त किया है. कड़ी मेहनत के कारण इन छात्राओं ने यह सफलता हासिल की है.





मोहिनी राऊत इन्फ्रिजीडेट इंजीनियर्स इंडिया प्रा.लि., अमरावती में एक्जिक्यूटिव अकाउंटंट के रुप में, नेहा वासु ईएसएएफ, स्मॉल फायनांस बैंक लि. में सेल्स एक्जिक्यूटिव तथा हर्षाली पाचगडे डव गारमेंट प्रा.लि. अमरावती में सेल्स एक्जिक्यूटिव के रुप में कार्यरत हैं. इस उल्लेखनीय सफलता के लिए कुलगुरु डॉ. बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, उसी प्रकार एमबीए विभाग प्रमुख डॉ. दीपक चावरकर ने विद्यार्थियों का अभिनंदन करते हुए उज्जवल भविष्य के लिए शुभकामनाएं दी.

जनमाध्यम

## अ.भा. आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती/का.प्र.

भारतीदासन युनिव्हर्सिटी, पल्लकालैपेरुर, तिरुचिरापल्ली (तामिळनाडू) येथे १४ ते १७ जानेवारी, २०२६ दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.



यामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, [illegible] गौरव राळुंडे, भूषण नायगोळे व प्रफुल्ल पवार, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा पवन दुर्गे व यश रंगारी, मानव स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अकोलाचा वेदांत देशमुख, प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेराचा ओम लोणारे व रुपेश ठाकरे, आर.आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शीचा किशन कांबळे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा साहील राऊत व ऋषिकेश चोंडेकर, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा मोरेश्वर महल्ले, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोडचा किशन जयस्वाल व तिलक तिवारी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा ज्ञानेश्वर राऊत याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. पुरुष व महिला चमूचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे ०२ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

नवराष्ट्र

**कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहते यांचे आवाहन: वाणिज्य महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद**

# तरुणांनो, 'एआय' वापरून स्वावलंबी बना

भंडारा, ब्युरो. नवीन शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना देणे हा आहे. तरुणांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सकारात्मक दृष्टीने करून नवीन तंत्रज्ञान विकसित करावे. कौशल्य आणि संशोधनाच्या आधारे विद्यार्थ्यांनी स्वावलंबी बनावे, असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहते यांनी केले.

येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात 'नवीन शैक्षणिक धोरणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर' या विषयावर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. बाराहते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. जी. डी. टेंभरे होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मल्टीयुनिवर्सिटी इंडियाचे संचालक डॉ. विक्रमसिंग पचलोरे, समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप मेश्राम, प्राचार्य डॉ. अजयकुमार मोहबंसी आणि समन्वयक डॉ. राजेंद्रप्रसाद पटले प्रामुख्याने उपस्थित होते.नवीन शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना देणे हा आहे,यावर मार्गदर्शन करण्यात आले.



## सामाजिक मूल्ये आणि तांत्रिक प्रगतीचा संगम

प्रमुख वक्ते डॉ. विक्रमसिंग पचलोरे यांनी मार्गदर्शन करताना नमूद केले की, प्राध्यापकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे विद्यार्थ्यांना वास्तविक परिस्थितीचे ज्ञान द्यावे. तंत्रज्ञानासोबतच सामाजिक मूल्यांचे संवर्धन करणे ही आजच्या वर्तमान शिक्षणाची मोठी गरज आहे. डॉ. प्रदीप मेश्राम यांनी सामाजिक विज्ञान शाखेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता उपयोग आणि त्याचे परिणाम यावर सविस्तर प्रकाश टाकला. सध्याच्या तांत्रिक युगात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे क्रांतिकारी परिवर्तन घडून येत असून तरुणांनी या प्रवाहाशी जुळवून घेत स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करावे, असा संदेश अध्यक्षीय भाषणात डॉ. जी. डी. टेंभरे यांनी दिला.

## शोधपत्रिकेचे प्रकाशन आणि तज्ज्ञांची चर्चा

या परिषदेच्या दोन सत्रांमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या योगदानावर उपस्थित प्राध्यापक आणि संशोधकांनी विस्तृत चर्चा केली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते परिषदेच्या विशेष शोधपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेला विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अजयकुमार मोहबंसी यांनी केले, तर संचालन डॉ. नलिनी बोरकर यांनी केले. शेवटी समन्वयक डॉ. राजेंद्रप्रसाद पटले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दिव्य मराठी

# निसर्ग असमतोल, पर्यावरण संवर्धन विषयावर विद्यापीठामध्ये व्याख्यान



विद्यापीठात आयोजित व्याख्यानादरम्यान सहभागी मान्यवर.

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात 'निसर्ग असमतोल व पर्यावरण संवर्धन' विषयावर अतिथी व्याख्यान पार पडले. अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख डॉ. के.बी. नायक, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. यू. राऊत, मार्गदर्शक म्हणून जवाहर नवोदय विद्यालयातील सेवानिवृत्त ग्रंथपाल नारायण पवार आदी उपस्थित होते.

यावेळी पवार यांनी व्याख्यानातून निसर्गातील असमतोलाची कारणे, मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विषद केले. पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक व्यक्तीने त्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे ते म्हणाले. व्याख्यानातून पर्यावरणीय असमतोल, त्याची कारणे व उपाययोजना याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. व्याख्यानानंतर नारायण पवार यांनी तयार केलेल्या बीज बँकेचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. यात स्थानिक दुर्मिळ वनस्पतींच्या विविध बियाण्यांचा समावेश होता. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी बीज बँकेचे महत्त्व प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे स्पष्ट करण्यात आले. तसेच काही बियाण्यांची समाजशास्त्र विभागाच्या परिसरात प्रात्यक्षिक स्वरूपात लागवड करण्यात आली.

### विद्यार्थ्यांनी संशोधनवृत्ती वाढवावी : डॉ. नायक

अध्यक्षीय भाषणात डॉ. के.बी. नायक यांनी पर्यावरण संवर्धनाचे समाजशास्त्रीय अभ्यासातील अनन्यसाधारण महत्त्व सांगितले. पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास यांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती वाढवावी, असे ते म्हणाले. संचालन डॉ. प्रशांत भगत, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील प्रा. साधना इंगोले, डॉ. रोहिणी वावरे, संशोधक विद्यार्थी राजकुमार सरयाम, शिक्षकेत्तर कर्मचारी प्रवीण गडलिंगकर, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी

# विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



राज पारखी



साक्षी चोपकर



स्नेहल शिवणकर

अमरावती : विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ मध्ये एम.एससी. भाग-२ भौतिकशास्त्र विषयाच्या परीक्षा घेण्यात आल्या. यामध्ये विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी राज अनिल पारखी प्रथम, साक्षी गजानन चोपकर तृतीय व स्नेहल रघुनाथ शिवणकर पाचवा क्रमाक पटकावून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादी स्थान मिळविले आहे. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, डॉ. जी.जी. मुळे, प्रा. श्वेता वाघमारे, प्रा. प्रियंका गोळे, प्रा. एस.व्ही. राठोड, प्रा. एन.एस.थोरात, प्रा. व्ही.ए. लोडे, प्रा.व्ही.डी. भोरजार या शिक्षकवृंदांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. भौतिकशास्त्र विभागाचे आतापर्यंत २५ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत, त्यात अनेक विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

# विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव अनिल मेश्राम, सहा. कुलसचिव मिलींद देशपांडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.

# देशोन्नती

## विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



राज पारखी | साक्षी चोपकर | स्नेहल शिवणकर

**देशोन्नती वृत्तसंकलन**

**अमरावती** : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी राज अनिल पारखी (प्रथम), कु. साक्षी गजानन चोपकर (तृतीय) व कु. स्नेहल रघुनाथ शिवणकर (पाचवा) विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एम.एस्सी. भाग-२ भौतिक शास्त्र विषयाच्या परीक्षेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, डॉ. जी.जी. मुळे, प्रा. कु. श्वेता वाघमारे, प्रा. प्रियांका गोळे, प्रा. एस.व्ही. राठोड, प्रा. एन. एस. थोरात, प्रा. व्ही. ए. लोडे, प्रा. व्ही. डी. भोरजार या शिक्षकवृंदांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभाग प्रमुख डॉ. संदीप वाघुळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्यात.



## कर्मचारी अपने परिवार के समान विद्यापीठ के कार्यों में जुटे रहते हैं : कुलगुरु डॉ. बारहाते

### विद्यापीठ के सेवानिवृत्त कर्मचारियों को समारोहपूर्वक बिदाई

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 3 जनवरी- विद्यापीठ के कर्मचारी अपने परिवार के समान स्वयं को विद्यापीठ के कार्यों में लगा देते हैं और ईमानदारी से काम करते हैं, ऐसा प्रतिपादन कुलगुरु डॉ.मिलिंद बारहाते ने किया. विद्यापीठ के कर्मचारियों के सेवानिवृत्ति अवसर पर आयोजित कार्यपूर्ति समारोह में बतौर अध्यक्ष वे बोल रहे थे. कार्यक्रम में बतौर प्रमुख अतिथि विद्यापीठ के व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.भैयासाहब मेटकर, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, लेखाधिकारी नीरज कुमार देशपांडे, अभियंता शशिकांत रोडे आदि सहित अनेक मान्यवर उपस्थित थे. कुलगुरु ने आगे कहा कि विद्यापीठ के निसर्गरम्य परिसर का श्रेय विद्यापीठ के उद्यान विभाग को है. वृक्षारोपण, संवर्धन के बड़े कार्य है तथा इसके लिए उद्यान विभाग ने भारी परिश्रम किया है. इसका श्रेय उद्यान विभाग के परीक्षक अनिल घोम को जाता है. इस प्रसंग पर कुलगुरु ने सेवानिवृत्त हुए सत्कार मूर्तियों को उनके उज्वल भविष्य के लिए शुभकामनाएं दी. इस अवसर पर कुलगुरु ने अनिल घोम, मोहन ठाकरे तथा प्रफुल्ल ठाकरे को शाल, श्रीफल, स्मृति चिन्ह, सम्मान प्रमाण पत्र प्रदान करके सम्मानित किया. इसी प्रकार सौ. घोम, सौ. ठाकरे व सौ. ठाकरे का प्रज्ञा बोडे ने साड़ी-चोली, कुमकुम का करंडा भेंट कर उनका सम्मान किया. प्रमुख अतिथि डॉ. मेटकर ने कहा कि विद्यापीठ के कर्मचारी अत्यंत विनम्रता व ईमानदारी से काम करते हैं. उनका संस्था के प्रति मेल, निष्ठा तथा ईमानदारी आज भी कायम है, ऐसा कहते हुए उन्होंने सभी सत्कारमूर्तियों को उनके उज्वल भविष्य के लिए शुभकामनाएं दी. इस प्रसंग पर तीनों सत्कारमूर्तियों ने अपने सेवाकाल के अनुभव विषद करते हुए कहा सहकारी कर्मचारियों से मिले प्रेम, स्नेह के बदले वे उनके प्रति आभार व्यक्त करते हैं. कर्मचारी संघ के अजय देशमुख ने अपने संबोधन में सत्कार मूर्तियों को शुभकामनाएं दी. इस प्रसंग पर विद्यापीठ कर्मचारी पतसंस्था की ओर से अध्यक्ष मंगेश वरखेड़े, उपाध्यक्ष डॉ.अविनाश असनारे, कोषाध्यक्ष राजेश एडले, सत्कारमूर्तियों को उनकी जमा राशि का धनादेश व पुस्तक देकर सत्कार किया. कार्यक्रम में विद्यापीठ के शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी उसी प्रकार सत्कारमूर्तियों के परिवार के सदस्य उपस्थित थे.

# दिव्य मराठी



प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

## समिक्षा-पल्लवीचा 'कलर कोट'ने गौरव

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत मास्टर ऑफ बिझनेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन विभागाच्या विद्यार्थिनी समिक्षा पाटोळ व पल्लवी वानखडे यांच्या इनोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' या प्रकल्पाला कलर कोट पुरस्कार मिळाला आहे. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते विद्यार्थिनींना पुरस्काराने गौरविण्यात आले.

विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत एम.बी.ए. विभागातील विकी कालवांडे, सोनाली खोब्रागडे, अभिषेक गुल्हाने यांही विद्यार्थ्यांनी आपापले संशोधन प्रकल्प सादर केले होते. त्याचबरोबर घर, कार्यालये, शाळा, रुग्णालये, वसतिगृहे, सार्वजनिक ठिकाणी वापरण्यासाठी उपयुक्त असून पर्यावरणाशी संबंधित समस्या सोडविण्यास मदत होते. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, तसेच एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

### तणापासून डास प्रतिबंधक स्प्रे, रुम फ्रेशनर तयार

समिक्षा व पल्लवी यांनी सादर केलेल्या इनोव्हेशन हिडन व्हॅल्यू ऑफ विड' प्रकल्पास पुरस्कार प्राप्त झाला. या प्रकल्पात उपद्रवी तणापासून डास प्रतिबंधक स्प्रे आणि रुम फ्रेशनर अशी हर्बल उत्पादने तयार करण्यात आली आहेत. ही उत्पादने स्वस्त, पर्यावरणपूरक व लहान मुले तसेच वृद्धांसाठी सुरक्षित आहेत. त्यामुळे सदर उत्पादने ही रासायनिक घरगुती वस्तुंना चांगला पर्याय ठरू शकतात.

दिव्य मराठी

# सॉफ्टबॉल स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा आगामी १ ते ५ फेब्रुवारीदरम्यान आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

ही स्पर्धा येथील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या मैदानात होईल. या स्पर्धेसाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

सदर चमूमध्ये भारतीय महाविद्यालय, अमरावतीचा ऋत्विक कुडवे, रोहीत सहारे व आकाश सोळंके, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जीचा ओम सोळंके व दिपेश वानखडे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा रोहण शेळके व रोहण पेटे, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा अनिकेत चौरे, युवाशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा करण सुपेकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा रोहण थोपडे, अंशुमन डोकरे व निलेश कोचे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा प्रथमेश धोरकर व अजय मळेकर यांचा समावेश आहे.

यासोबतच अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळचा भाकित मेश्राम, कुणाल लोणारे, रोहीत मेश्राम व यश विरुळकर, भाऊसाहेब भोरे शिक्षकी महाविद्यालय, बाभुळगांवचा सर्वेश इंझळकर, रामकिष्ण महाविद्यालय, दर्यापूरचा प्रशिक गवई आणि श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा मोहीत भिसे याचाही या चमूत प्रामुख्याने समावेश यावेळी आहे.

## २५ पर्यंत सराव शिबिर

या चमूचे सराव शिबिर (प्रशिक्षण वर्ग) श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे सुरु झाले असून ते आगामी २५ जानेवारीपर्यंत चालणार आहे. या प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले होते. त्या आवाहनानुसार सराव शिबिरात सर्व विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी मान्यवरांनी विविध माहितीवर आपले मार्गदर्शन केले.

देशोन्नती

# विद्यापीठाच्या संशोधकांना मिळाले दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट





## संशोधकांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान

देशोन्नती वृत्तसंकलन

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या तीन संशोधकांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटेन्ट प्राप्त करुन आंतराष्ट्रीय स्तरावर अमरावती विद्यापीठाचा बहुमान वाढविला आहे. प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे व संशोधक विद्यार्थीनी कु. पुजा मांडवीय यांनी 'ए किट फॉर रॅपिड डिटेक्शन ऑफ मिनिमम इनहिबीटरी कन्सन्ट्रेशन ऑफ ॲन्टीबायोटिक्स अगेन्स्ट सिलेक्टेड बॅक्टेरियल स्पेशिस' या विषयावर संशोधन केले आहे. विशिष्ट जीवाणूंविरुद्ध प्रतिजैविकांची परिणामकारकता तपासण्यासाठी लागणारा वेळ या किटमुळे कमी होणार आहे. एवढेच नाही, तर आरोग्य क्षेत्रात अचूक उपचारांसाठी हे संशोधन अत्यंत मोलाचे ठरणार आहे.

विशेष म्हणजे डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. नीरज घनवटे यांचे हे तिसरे पेटेन्ट आहे. कोरोना, काळात या संशोधकांनी अमरावती जिल्ह्यात 'मॉलिक्युलर डायग्नोसिस लॅब' स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जवळपास ५ लाखांहून अधिक कोविड चाचण्या करुन त्यांनी जिल्हाच्या आरोग्य व्यवस्थेला मोठा हातभार लावला आहे. हैदराबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सुध्दा त्यांच्या या संशोधनाचे कौतुक करुन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विविध विभागप्रमुखांनी या संशोधक टीमचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे विद्यापीठाच्या संशोधन कार्याची आता जागतिक स्तरावर दखल घेतली जात असल्याचे देखील सिध्द झाले आहे.

लोकमत

# अमरावती विद्यापीठाच्या संशोधकांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका; दक्षिण आफ्रिकेचे 'पेटंट' प्राप्त


लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यापीठाच्या जीवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या संशोधकांनी विकसित केलेल्या एका नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाला दक्षिण आफ्रिका सरकारचे 'पेटंट' बहाल करण्यात आले आहे. अमरावती विद्यापीठाच्या या चमूचे हे तिसरे पेटंट असून, आरोग्य उपचारासाठी मौलिक ठरणारे आहे.

प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे आणि संशोधक विद्यार्थिनी पूजा मांडविय यांनी 'निवडक जीवाणूंविरुद्ध प्रतिजैविकांच्या किमान प्रतिबंधात्मक एकाग्रतेचा शोध घेण्यासाठी एक किट' या विषयावर हे महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे.

विशिष्ट जीवाणूंविरुद्ध प्रतिजैविकांची परिणामकारकता तपासण्यासाठी लागणारा वेळ या किटमुळे कमी होणार आहे. आरोग्य क्षेत्रात अचूक उपचारांसाठी हे संशोधन अत्यंत मोलाचे ठरणार आहे.


प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे


पूजा मांडवीय


डॉ. नीरज घनवटे

## आंतरराष्ट्रीय गौरव

नुकत्याच हैदराबाद येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेतसुद्धा त्यांच्या या संशोधनाचे कौतुक होऊन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय यशामुळे विद्यापीठाच्या संशोधन कार्याची दखल आता जागतिक स्तरावर घेतली जात असल्याचे सिद्ध झाले आहे.

## अतुलनीय योगदान

डॉ. प्रशांत ठाकरे आणि डॉ. नीरज घनवटे यांचे हे तिसरे पेटंट आहे, जे त्यांच्या सातत्यपूर्ण संशोधनाची साक्ष देते. या संशोधक जोडीने अमरावती जिल्ह्यात 'मॉलिक्युलर डायग्नोसिस लॅब' स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. याद्वारे पाच लाखांहून अधिक कोविड चाचण्या करून त्यांनी जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठे योगदान दिले आहे. कोरोनाकाळातील सेवा महत्त्वपूर्ण ठरली आहे.

प्रतिदिन अखबार

# विद्यापीठ में मनाई मां जिजाऊ जयंती



संगाबा अमरावती विद्यापीठ के अतिथिगृह में वैदर्भिय कन्या राजमाता जिजाउ की जयंती उत्साह से मनाई गई. इस अवसर पर प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडल के संचालक डॉ.नितिन कोली ने मां जिजाउ के तैलचित्रों का पूजन व माल्यार्पण करके विद्यापीठ की ओर से अभिवादन किया. जयंती कार्यक्रम में नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडल के संचालक डॉ.अजय लाड, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, उपकुलसचिव डॉ.दादासाहब चव्हाण, सहायक कुलसचिव डॉ.वीरेंद्र निमजे, विद्यापीठ कर्मचारी संघ के अध्यक्ष अजय देशमुख, महासचिव नरेंद्र घाटोल, पीआरओ डॉ.विलास नांदूरकर उसी प्रकार विद्यापीठ के अधिकारी व कर्मचारी बडी संख्या में उपस्थित थे.







संगाबा अमरावती विद्यापीठ के स्वामी विवेकानंद अध्यास केंद्र, रासेयो, श्री रामकृष्ण विवेकानंद समिति व ग्रंथालय के संयुक्त तत्वावधान में विवेकानंद जयंती पर आयोजित संकल्प दौड में शहर के सैकडों शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थियों ने भाग लिया. स्वामी विवेकानंद कालोनी स्थित स्वामी विवेकानंद के पुतले पर अतिथियों द्वारा दीप प्रज्वलन व माल्यार्पण करके अभिवादन किया गया. इस अवसर पर विद्यापीठ के सभी पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थियों सहित बडी संख्या में गणमान्य नागरिक उपस्थित थे.विद्यापीठ में वक्तृत्व स्पर्धा-राजमाता जिजाउ व स्वामी विवेकानंद के विचार व कार्यों से विद्यार्थियों को आदर्श लेकर अपने जीवन को गढ़ना, कौशल्य व व्यक्तित्व विकास करना चाहिए, ऐसा प्रतिपादन अधिष्ठाता डॉ.मोना चिमोटे ने किया. उपस्थित मान्यवरों ने सभी को मां जिजाउ व स्वामी विवेकानंद जयंती की शुभकामनाएं दी. सोमवार, 12 जनवरी को राजमाता जिजाउ, स्वामी विवेकानंद की प्रतिमा का पूजन व पुष्पार्पण व दीप प्रज्वलन करके अभिवादन किया. कार्यक्रम में विद्यापीठ के शिक्षक, अधिकारी व कर्मचारी बडी संख्या में उपस्थित थे.

वक्तृत्व स्पर्धा के अवसर पर प्रभारी कुलसचिव डॉ.नितिन कोली, वित्त व लेखाधिकारी पुष्पक देशपांडे, डॉ.स्वाति शेरेकर तथा वक्तृत्व स्पर्धा के आयोजक तथा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग के संचालक डॉ.श्रीकांत पाटिल उपस्थित थे. डॉ.मोना चिमोटे ने स्पर्धा के उद्घाटन की घोषणा की.

जनमाध्यम

# मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाने पुढाकार घ्यावा-डॉ.के.बी. नायक







अमरावती/का.प्र.

मतिमंद मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनासोबतच समाजानेही सक्रीय भूमिका घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. के. बी. नायक यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून अमरावती शहरातील निवासी मतिमंद मुलांच्या शाळेला भेट दिली. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. डॉ. नायक यांनी मतिमंद मुलांसाठी विशेष योजना राबविण्याची आवश्यकता असून त्यांच्या शिक्षण, आरोग्य, पुनर्वसनासाठी अधिक व्यापक धोरणांची अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे नमूद करून मतिमंद मुलांच्या विविध समस्यांसंदर्भात संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवून विद्यापीठ स्तावर संशोधन होणे अत्यंत गरजेचे असून त्या माध्यमातून मतिमंद मुलांच्या विकासाकरिता नवीन संधी उपलब्ध करून देता येतील, जेणेकरून अशा विद्यार्थ्यांना समाजामध्ये प्रतिष्ठेने जीवन जगण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले. शाळेचे मुख्याध्यापक श्री उमेश घुमाळे यांनी मतिमंद मुलांना भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक, मानसिक व सामाजिक समस्यांची माहिती उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना दिली. तसेच शाळेतील अध्यापकांनी वसतिगृह व शाळेमधील सुविधांची माहिती दिली. याप्रसंगी विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतिमंद विद्यार्थ्यांसोबत नृत्य, गाणे यांसारखे मनोरंजनात्मक उपक्रम राबवून शाळेतील मुलांचा आनंद द्विगुणित केला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना फळ व खाऊचे वाटप करण्यात आले. ही शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणीव वाढविणारी व मतिमंद मुलांच्या जीवनातील अडचणी समजून घेण्यास उपयुक्त ठरली. शाळा व्यवस्थापनाने या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले. संचालन संशोधक विद्यार्थीनी निर्मल खडसे, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. याप्रसंगी समाजशास्त्र विभागातील डॉ.के.यु. गजभ, डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, प्रा.साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, संशोधक विद्यार्थी राजकुमार सरदार, रमेश पवार, गोपाल वानखडे, शिक्षकेतर कर्मचारी प्रवीण गडलीनकर, प्रतिष्ठित नागरिक व समाजसेवक नारायण पवार तसेच शिक्षकवृंद अनिल वाळके, श्रद्धा काळबांडे, प्रेरणा वाडे, निखिल वानखुडे, विशाल शिंगणे, मुकुंद वडणे, अजय काळज्योती कळसकर उपस्थित होते.

नवराष्ट्र

# कृत्रिम बुद्धिमत्तेतून सर्वांगीण विकास साधावा

## कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे आवाहन



### शैक्षणिक

अकोला, ब्युरो. स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात पीएम उषा अंतर्गत दोनदिवसीय कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गणितीय विज्ञानातील नवोन्मेष या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास बुधवारी (दि. २१)प्रारंभ झाला. हे चर्चासत्र गुरुवारपर्यंत सुरू राहीले. या चर्चासत्राचे उद्‌घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव गोपाल खंडेलवाल होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, बीजभाषक डॉ. मिलिंदकुमार सरोदे, प्रमुख अतिथी डॉ. विद्या शर्मा, समन्वयक डॉ. दीप्ती पेठकर, डॉ. रवी रेवासकर, डॉ. नितीन सुरडकर आदी उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात गोपाल खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांनी नवी स्वप्ने बघून संशोधन करावे. आपला देश प्रगती करतो, त्याला गतिमान करण्याची गरज आहे. त्यामुळे या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रास्ताविक प्राचार्य जगदीश साबू तर बीजभाषण डॉ. मिलिंदकुमार सरोदे यांनी केले. यावेळी प्रमुख अतिथी डॉ. विद्या शर्मा यांनी मार्गदर्शन केले. संचालन डॉ. डिम्पल मापारी यांनी केले, तर आभार रवींद्र रेवासकर यांनी मानले. दरम्यान, चर्चासत्राच्या प्रथम सत्रात डॉ. ए. ए. तायडे, झिंग चंग शू (ऑस्ट्रेलिया) यांनी आपले शोध विचार व्यक्त केले. डॉ. लक्ष्मण मुळे यांच्या अध्यक्षतेत संपन्न द्वितीय सत्रात आशिष मनचंदाना ऑस्ट्रेलिया यांनी आपले विचार व्यक्त केले. अंतिम सत्रात डॉ. व्ही. आर. पाटील, डॉ. दहिगुडे यांच्या उपस्थितीत अर्पित राईकवार आदींनी पेपरवाचन केले.

### संशोधन व नवनिर्मितीत तरुणांचा सहभाग

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मिलिंद बारहाते यांनी सांगितले की, जग बदलत आहे. त्यानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात तंत्रज्ञान बदलत आहे. भारतातही याबाबत जागृती वाढत असून, संशोधन व नवनिर्मितीत युवकांचा सहभाग वाढत आहे. भविष्यात एआय, मशीन लर्निंग, कॉम्प्युटर, स्पेस टेक्नॉलॉजीमध्ये खूप संधी उपलब्ध असून, विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ करून घ्यावा. देशातील लहान शहरात स्टार्ट अपच्या संधी निर्माण होत असून, यात महिलांचेही खूप योगदान आहे. त्या अधिक सक्षम होत आहेत. विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, इन्फ्रास्ट्रक्चर, डीप टेक्नॉलॉजी यावर मूलभूत संशोधन करून देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन केले.

लोकमत



# विद्यापीठात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती

**अमरावती :** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रात साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वैशाली गुडधे, डॉ. एच. पी. नंदुरकर, डॉ. वैशाली धनविजय, डॉ. सुजाता काळे, डॉ. जागृती बारब्दे, उपकुलसचिव मिनल मालधुरे, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, डॉ. विलास नांदुरकर आदी उपस्थित होते.

विद्यार्थी संघटनांशी संवाद

# विद्यार्थी हिताच्या समस्यांना सर्वोच्च प्राधान्य

## कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांचे आश्वासन

प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती,२३ जानेवारी : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये झालेल्या विद्यार्थी संघटनांच्या सभेत कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यार्थी समस्यांना सर्वोच्च प्राधान्य देत विद्यार्थी हिताच्या समस्या सोडविण्यात येतील, असे आश्वासन विद्यार्थी संघटनांना दिले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ.श्रीकांत जिचकार स्मृती सभागृह येथे विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांमधील विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींची सभा संपन्न झाली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व प्रतिनिधींनी मांडलेल्या समस्या आत्मियतेने ऐकून घेत विद्यार्थी हिताचे निर्णय विद्यापीठ सदैव घेत राहील, असे विद्यार्थी संघटनांना आश्वस्त केले.




सभेला कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम.मेटकर, डॉ.अविनाश बोर्डे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.नितीन कोळी, विद्यार्थी विकास संचालक तथा समितीचे सदस्य सचिव डॉ.राजीव बोरकर, अधिसभा सदस्य डॉ.रितेश खुलसाम, अमोल ठाकरे, कैलास चव्हाण, अमोल देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास नांदुरकर तसेच युवासेनेचे पंकज सोळंके, ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनच्या कु. प्रतिक्षा डोंके, एनएसयुआयचे संकेत साहू, आकाश हेडाऊ, सचिन श्री अजिंक्य गौरखेडे, शुभम वांधाले, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद, अकोलाचे ॲड.आकाश हिवराळे, आदित्य अवचार, विद्यार्थी सेनेचे इशान सव्वा, आयवायसीचे कुणाल जोग, युवा स्वाभिमान पार्टीचे पंकज सुरडकर, सार्थ उमक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे निकेत कनाने, अर्जुन ठाकरे, तृप्ती चव्हाण आदी उपस्थित होते. संचालन, प्रास्ताविक व आभार डॉ. राजीव बोरकर यांनी मानले.

आपली मातृभूमि

# आहार प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यापीठातील गृह विज्ञान विभाग व झेनिथ हॉस्पिटलचे संयुक्त आयोजन







प्रतिनिधी/६ जानेवारी

अमरावती - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभाग व अमरावती शहरातील प्रसिध्द झेनिथ हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज येथे हृदयरोगांसाठी आरोग्य कार्यक्रमांतर्गत आहार प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शनीमध्ये गृहविज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी आहाराविषयी विविध मॉडेल व पोस्टरव्दारे आहाराविषयी नागरिकांना जागरूक केले. हृदय रुग्णांनी कोणते पदार्थ सेवन करावेत, कोणते टाळावेत, प्रक्रिया केलेले अन्न, मैद्याचे पदार्थ, बिस्किटे, शीतपेयांचे दुष्परिणाम, मीठ, साखरेचे अति सेवन टाळण्याचे महत्त्व विद्यार्थिनींनी प्रभावीपणे सांगितले. त्याचबरोबर प्रथिने, फायबरयुक्त अन्नपदार्थ, कडधान्ये, फळे, पालेभाज्या व धान्यांचा समावेश केल्यास आरोग्य व हृदयावर होणारे सकारात्मक परिणाम प्रत्यक्ष मॉडेल्सद्वारे नागरिकांना पटवून देण्यात आले. तळलेले पदार्थ, फास्टफुड, मैदा, बिस्किटे, साखरयुक्त शीतपेये, प्रक्रिया केलेले मांस व जंकफुड यांचे अतिसेवन हृदय व आरोग्यास कसे हानिकारक ठरते, याची माहिती नागरिकांना देतांना अन्नगटांची ओळख, फुड पिरॅमिडचे महत्त्व, दैनंदिन आहारात भाज्या, फळे, धान्ये व प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश कसा करावा, तेल, साखर, जंकफुडचे मर्यादित सेवन का आवश्यक आहे याविषयी सुध्दा मार्गदर्शन करण्यात केले. आहार प्रदर्शनीला किशोरवयीन मुलांपासून तर ज्येष्ठ नागरिकांनी भेट दिली. कार्यक्रमासाठी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांचे मार्गदर्शन लाभले.

विदर्भ मतदार

# विद्यापीठात 'हेल्थ अँड फिटनेस वीक' उपक्रम

## मतदार जनजागृतीसह आरोग्य व तंदुरुस्तीचा संदेश

नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. ३१ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या एम.पी.एड. शारीरिक शिक्षण विभागातर्फे विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या प्रांगणात 'हेल्थ अँड फिटनेस वीक' हा उपक्रम पार पडला. प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच नागरिकांचा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




या कार्यक्रमाचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मनपा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम तसेच शिक्षण विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत, शारीरिक शिक्षण विभागातील प्राध्यापकवर्ग, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनी आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, खेळ व सकारात्मक जीवनशैली आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते. प्रमुख अतिथी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'हेल्थ अँड फिटनेस वीक' अंतर्गत आरोग्यविषयक जनजागृती, तंदुरुस्तीचे महत्त्व, शारीरिक शिक्षणाची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच मतदार जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. उपस्थित प्रशिक्षणार्थी व नागरिकांनी मतदानाची शपथ घेऊन लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला. मतदानाचे महत्त्व, नागरिकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमात एकूण ३७० प्रशिक्षणार्थी व नागरिकांनी सहभाग नोंदवला. यावेळी स्वीप प्लॅन सदस्य उज्वल जाधव उपस्थित होते.


## जनमाध्यम

# विद्यार्थ्यांनो! आपल्या नवकल्पानांना प्रत्यक्षात उतरवा-डॉ. विनायक देशपांडे

अमरावती/का.प्र.

संशोधनासाठी अनेक क्षेत्रे खुली आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील नवकल्पनांना केवळ विचारांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. 'अविष्कार' स्पर्धा हे अशा सर्जनशील विचारांसाठी एक महत्वाचे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी आपले संशोधन समाजासाठी उपयुक्त कसे ठरेल, याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे, असे प्रतिपादन जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अविष्कार सेल तर्फे आयोजित विद्यापीठ स्तरीय 'आविष्कार' स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अविष्कार स्पर्धेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. विनायक देशपांडे पुढे म्हणाले, तत्कालीन कुलपती कृष्णा यांनी ही स्पर्धा महाराष्ट्रात सुरु केली आणि त्यानंतर या उपक्रमाला मिळालेली गती यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मोठी चालना मिळाली आहे. आजच्या तरुणांकडे संशोधनात्मक कल्पनांची कमतरता नाही, गरज आहे ती कठोर परिश्रमाची आणि सातत्याची. संशोधन हे केवळ पीएच.डी. मिळवण्यापुरते मर्यादित नसावे, तर त्यातून



विद्यापीठात 'आविष्कार' स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

दर्जेदार जीवन जगण्यासाठी मार्ग सुकर व्हावा, असेही ते म्हणाले. त्यांनी पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे 'संशोधन विषयाची निवड' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कोअर नॉलेज आणि लॅब स्किल्स : संशोधनासाठी मूलभूत ज्ञान आणि प्रयोगशाळेतील कौशल्ये किती महत्वाची आहेत, हे त्यांनी पटवून दिले. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कौशल्ये ओळखून, समाजाला फायदेशीर ठरेल असा विषयाचे करिअर करावे, असा सल्ला त्यांनी दिला. केवळ संशोधन करून थांबणार नाही, तर ते जगासमोर मांडण्यासाठी उत्तम संवाद कौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. संशोधन व नवोपक्रम हा अर्थव्यवस्थेचा कणा-कुलगुरू अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, शेतकरी आत्महत्येसंदर्भात विद्यापीठाने संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे व या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्येच्या घटनांना कमी करण्याचे प्रयत्न होतील. भारतालाही आता संशोधन आणि नवोपक्रमाला मोठ्या प्रमाणात वाव मिळत असून भारताची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरु आहे व यात विद्यार्थ्यांची जबाबदारी सुध्दा अधिक वाढली आहे. उद्याचे भविष्य हे विद्यार्थीच असल्याने ही जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी. परंतु असे करित असतांना कोणतेही संशोधन हे समाज, राष्ट्राच्या हिताचे असावे, त्याशिवाय ते शून्य आहे, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना केले. यावेळी कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे, माजी प्र-कुलगुरु डॉ. प्रसाद वाडेगावकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड आदींनी विद्यार्थ्यांच्या मॉडेलची पाहणी करुन त्यांच्याशी संवाद साधत नवसंशोधक विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेलच्या उपयोगितांबाबत माहिती घेतली. सूत्रसंचालन प्रा. मेघा कोटक, स्वागतपर भाषण व पाहुण्यांचा परिचय डॉ. नीरज घनवटे यांनी करुन दिला. प्रास्ताविकामधून आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट केला, आभार डॉ. सुजाता काळे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, याशिवाय जिल्ह्यांमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्य नगरी

# विद्यार्थ्यांनो! नवकल्पनाना प्रत्यक्षात उतरवा

### कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांचे आवाहन

### अमरावती विद्यापीठात 'आविष्कार' स्पर्धा



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती :** संशोधनासाठी अनेक क्षेत्रे खुली आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील नवकल्पनांना केवळ विचारांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. अविष्कार स्पर्धा हे अशा सर्जनशील विचारांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील अविष्कार सेलतर्फे आयोजित विद्यापीठ स्तरीय 'आविष्कार' स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. प्रवीण उपरे यांनी दक्षिण कोरियातून ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'कोअर नॉलेज आणि लॅब स्किल्स' संशोधनासाठी मूलभूत ज्ञान आणि प्रयोगशाळेतील कौशल्ये किती महत्त्वाची आहेत, हे त्यांनी पटवून दिले. अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, की शेतकरी आत्महत्येसंदर्भात विद्यापीठाने संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे व या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्येच्या घटनांना कमी करण्याचे प्रयत्न होतील. मॉडेल्सचे भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहामध्ये सादरीकरण करण्यात आले. यावेळी माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड आदींनी विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सची पाहणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मेघा कोटक, स्वागतपर भाषण डॉ. नीरज घनवटे, प्रास्ताविक आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे, तर आभार डॉ. सुजाता काळे यांनी मानले.

दिव्य मराठी

**स्पर्धा •** विद्यापीठात आविष्कार स्पर्धेचे उत्साहात उद्‌घाटन, विद्यार्थ्यांनी सादर केले मॉडेल्स

# आपल्या नवकल्पनांना प्रत्यक्षात उतरवा : कुलगुरू विनायक देशपांडे

प्रतिनिधी | अमरावती

संशोधनासाठी अनेक क्षेत्रे खुली आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील नवकल्पनांना केवळ विचारांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. अविष्कार' स्पर्धा हे अशा सर्जनशील विचारांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी आपले संशोधन समाजासाठी उपयुक्त कसे ठरेल, याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे, असे प्रतिपादन जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील अविष्कार सेलतर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय ,आविष्कार स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तत्पूर्वी अविष्कार स्पर्धेचे उद्‌घाटन झाल्याची घोषणा करून डॉ. विनायक देशपांडे पुढे म्हणाले, तत्कालीन कुलपती कृष्णा यांनी ही स्पर्धा महाराष्ट्रात सुरू केली.



विद्यापीठात आविष्कार स्पर्धेचे उद्‌घाटन करताना मान्यवर दिसत आहेत.

## संशोधन व नवोपक्रम हा अर्थव्यवस्थेचा कणा : कुलगुरू

अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, शेतकरी आत्महत्येसंदर्भात विद्यापीठाने संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्येच्या घटनांना कमी करण्याचे प्रयत्न होतील. आविष्कार हा राज्यपाल अभिमत प्रकल्प आहे. राज्यभरातील कुलगुरूंच्या होणाऱ्या सभांमध्ये राज्यपालांकडून आविष्कारची आवर्जून माहिती घेतली जाते. त्यामुळे आविष्कार हा संशोधनाचा उत्सव असून, कोणत्याही देशाच्या अर्थ व्यवस्थेचा कणा हा संशोधन व नवोपक्रम हाच आहे. त्यामुळेच हा प्रकल्प राज्यभरात सुरू करण्यात आला. तसेच ज्या देशांना आपण प्रगत राष्ट्र असे संबोधतो, त्या देशांच्या विकासामागे संशोधन, नवोपक्रम आहे.

त्यानंतर या उपक्रमाला मिळालेली गती, यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मोठी चालना मिळाली आहे. आजच्या तरुणांकडे संशोधनात्मक कल्पनांची कमतरता नाही, गरज आहे ती कठोर परिश्रमांची आणि सातत्याची. संशोधन हे केवळ पीएच.डी. मिळवण्यापुरते मर्यादित नसावे, तर त्यातून दर्जेदार जीवन जगण्यासाठी मार्ग सुकर व्हावा, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी बिहारमधील मोहम्मद सैदुल्ला यांनी नदी ओलांडण्यासाठी तयार केलेल्या पाण्यावर चालणाऱ्या सायकलचा दाखला देत, गरज हीच संशोधनाची जननी असल्याचे स्पष्ट केले.

तसेच कार्यक्रमात डॉ. प्रवीण उपरे यांनी दक्षिण कोरियातून ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे संशोधन विषयाची निवड यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कोअर नॉलेज आणि लॅब स्किल्स : संशोधनासाठी मूलभूत ज्ञान आणि प्रयोगशाळेतील कौशल्ये किती महत्त्वाची आहेत, हे त्यांनी पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मेघा कोटक, स्वागतपर भाषण व पाहुण्यांचा परिचय डॉ. नीरज घनवटे यांनी करून दिला. प्रास्ताविक डॉ. मनिषा कोडापे यांनी तर आभार डॉ. सुजाता काळे यांनी मानले.

### विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सचे सादरीकरण पाहून प्रशंसा

नवसंशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या नवनवीन कल्पनांना आकार देऊन तयार केलेल्या मॉडेल्सचे भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात सादरीकरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सची पाहणी करून त्यांच्याशी संवाद साधत नवसंशोधक विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेल्सच्या उपयोगितेबाबत माहिती घेतली.

# Students actively participate in debate on 'Gen Z'

■ Amravati Bureau

AMRAVATI, Jan 16

RAJMATA Jijau and Swami Vivekananda Jayanti (Youth Day) was celebrated with enthusiasm at the Department of Sociology, Sant Gadge Baba Amravati University. On this occasion, the department organised a debate competition on the topic 'Gen Z (The New Generation)' to encourage critical thinking among students.

The programme was presided over by Dr K B Nayak, Head of the Department while Dr K U Raut was present as the chief guest. The event highlighted the inspirational thoughts of Swami Vivekananda, emphasising values such as self-confidence, character building, patriotism and social responsibility among youth. Ramesh Pawar, Research scholar, presented an overview of the contributions of Rajmata Jijau and Swami Vivekananda. Prof Sadhana Ingole, while speaking on the role of Rajmata Jijau, also shed light on the significant contribution of social reformers such as Savitribai Phule, Ramabai Ambedkar, Pandita Ramabai and Ahilyabai Holkar in bringing social transformation.



Dignitaries present at the programme.

In the debate competition, Gayatri Kharbade, M A Part II student spoke about the positive aspects of the Gen Z generation, stating that today's youth are technology friendly, aware, innovative and open to change.

On the other hand, Nirmal Kale, M A Part I student, highlighted the negative aspects of Gen Z, including over-dependence on social media, stress, lack of patience and detachment from traditional values.

In his presidential address, Dr K B Nayak stated that Gen Z is a generation full of opportunities as well as challenges. He emphasised that with proper guidance, value-based education and rational thinking, this generation can play a vital role in social transformation.


He urged students to imbibe and carry forward the ideals of Rajmata Jijau and Swami Vivekananda.

The programme was conducted by Dr Prashant Bhagat, while Gayatri Kharbade proposed a vote of thanks. Faculty members Dr Rohini Deshmukh, Prof Sadhana Ingole, Prof Sunita Ingale, Dr Rohini Wavre, along with Ramesh Pawar, Gopal Wankhade, Pravin Ghardinkar and a large number of students were present for the event.

TheHitavada

# SGBAU researchers' work gets patent from Govt of South Africa

■ **Amravati Bureau**
AMRAVATI, Jan 23


Dr Prashant Thakre


Neeraj Ghanvate


Puja Mandviya

SANT Gadge Baba Amravati University (SGBAU) has added another feather to its cap. An innovative technology developed by researchers from the Department of Biotechnology and Microbiology has been granted a patent by the Government of South Africa. This international recognition highlights the university's growing contribution to global level.

The patented research titled 'A kit for rapid detection of minimum inhibitory concentration of antibiotics against selected bacterial species' has been developed by Prof Dr Prashant Thakre, Dr Neeraj Ghanvate and Puja Mandviya, research scholar.

The newly developed kit significantly reduces the time required to determine the effectiveness of antibiotics against specific bacterial species. This innovation is expected to play a crucial role in the healthcare sector by enabling faster and more accurate treatment decisions, thereby improving patient outcomes and combating antibiotic resistance.

This achievement marks a hat-trick of patents for Prof Dr Prashant Thakre and Dr Neeraj Ghanvate, underlining their consistent and impactful research work.

During the COVID-19 pandemic, the same research team played a key role in establishing a Molecular Diagnosis Laboratory in Amravati district. Through this facility, more than 5 lakh COVID-19 tests were conducted, making a significant contribution to strengthening the district's healthcare system.

Their work has also received international acclaim, as the research was recently honored with an award at an international conference held in Hyderabad. Dr Milind Barhate, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University, Dr Avinash Asnare, Registrar and Heads of various departments have congratulated the research team for this prestigious achievement. University officers noted that this international patent has further established Sant Gadge Baba Amravati University's research excellence on the global platform.

# अमरावती-विद्यापीठ के संशोधकों ने अंतरराष्ट्रीय स्तर पर किया नाम

## दक्षिण अफ्रीका का 'पेटंट' किया हासिल







भास्कर प्रतिनिधि | अमरावती. संगाबा अमरावती विद्यापीठ ने एक और सफलता हासिल की है। विद्यापीठ के जीवतंत्रज्ञान व सूक्ष्म जीव शास्त्र विभाग के संशोधकों ने विकसित किए एक नवीनतापूर्ण तंत्रज्ञान को दक्षिण अफ्रीका सरकार ने 'पेटंट' बहाल किया है। प्रा. डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज धनवटे व संशोधक छात्रा पूजा मंडन मांडवीय 'A kit for rapid detection of minimum inhibitory concentration of antibiotics against selected bacterial species' इस विषय पर महत्वपूर्ण संशोधन किया है। विशेष जीवाणुओं के खिलाफ प्रति जैविकों की परिणामकारकता जांचने के लिए लगनेवाला सामान इस किट से कम होगा। स्वास्थ्य क्षेत्र में निश्चित उपचार के लिए यह संशोधन काफी मौलिक साबित होगा। डॉ. प्रशांत ठाकरे व डॉ. नीरज धनवटे का यह तीसरा 'पेटंट' है। जो उनके परिश्रमपूर्ण संशोधन की गवाही देता है। इस संशोधक जोड़ी ने अमरावती जिले में 'मॉलिक्यूलर डायग्नोसिस लैब' स्थापन करने में महत्वपूर्ण भूमिका निभाई थी। इसके द्वारा 5 लाख से ज्यादा कोविड जांच कर उन्होंने जिले के स्वास्थ्य व्यवस्था को बड़ा योगदान दिया है।

हाल ही में हैदराबाद में हुई अंतरराष्ट्रीय परिषद में भी उनके इस संशोधन की प्रशंसा कर उन्हें पुरस्कार से सम्मानित किया गया था। इस सफलता पर कुलगुरु, कुलसचिव तथा विविध विभागों के प्रमुखों ने संशोधक टीम का अभिनंदन किया है। इस अंतरराष्ट्रीय सफलता से विद्यापीठ के संशोधन कार्य की दखल अब विश्व स्तर पर ली जा रही है।

आपली मातृभूमि

# एआय. आधारित हुमन रिसोर्स प्लॅनिंग सिस्टीमसाठी डॉ.रत्नशील खोब्रागडे यांना पेटेन्ट

**प्रतिनिधी/२३ जानेवारी**

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. रत्नशील खोब्रागडे यांना कृत्रिम बुध्दीमत्ता आधारित हुमन रिसोर्स प्लॅनिंग सिस्टीम फॉर ऑर्गनायझेशनल परफॉर्मन्स या अभिनव प्रणालीस भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. या डिझाईनची नोंदणी दि. १६ सप्टेंबर, २०२५ रोजी करण्यात आली आणि डिझाईन नियम २००१ अंतर्गत मंजूर करण्यात आली आहे. सदर डिझाईन वर्ग १४-०२ मध्ये नोंदणीकृत करण्यात आली आहे. या संशोधनात्मक आणि नवोन्मेषी प्रणालीचे संशोधक म्हणून डॉ. रत्नशील खोब्रागडे यांच्यासह डॉ. महेंद्र मकेसर, डॉ. शिखा मक्कर व शीतल गाडेकर, डॉ. पुंगोडी सेन्थिल कुमार, दिव्या गर्ग, सौ. दीक्षा गर्ग आणि सौ. अंकिता शेंडे यांची नावे नोंद विण्यात आली आहेत. ही एआय आधारित प्रणाली संस्थेतील मानव संसाधन व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, अचूक आणि परिणामकारक करण्यासाठी उपयुक्त ठरणार असून कर्मचारी कार्यक्षमता, नियोजन, निर्णय प्रक्रिया आणि संस्थात्मक कामगिरी सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यामुळे शैक्षणिक, औद्योगिक आणि प्रशासकीय क्षेत्रात या प्रणालीचा व्यापक वापर होऊ शकेल. हे यश संशोधन, नवोन्मेष आणि बौद्धिक संपदा क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मो. अतीक यांनी अभिनंदन केले आहे.



दिव्य मराठी

# आविष्कार स्पर्धेतील सहभागी ४७ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

प्रतिनिधी | अमरावती


विद्यापीठ स्तरावर पार पडलेल्या आविष्कार स्पर्धेत निवड झालेल्या ४७ विद्यार्थ्यांची चमू आगामी २८ ते ३१ जानेवारी दरम्यान परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होणार आहे.. त्याकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अविष्कार सेलच्या वतीने सदर चमूंसाठी मार्गदर्शन कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी चमूंना तज्ज्ञांनी योग्य ते मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. सुजाता काळे, डॉ. स्वाती शेरेकर, डॉ. हेमलता नांदुरकर, डॉ. कमलाकर मोरे, डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. नीरज घनवटे, डॉ. अनिता पाटील, डॉ. जागृती बारब्दे, डॉ. शितल तायडे, डॉ. दीपक चाचरकर, डॉ. संध्या भगत, प्रा. पल्लवी कांदळकर या तज्ज्ञांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, वैद्यक व फार्मसी, शुद्ध विज्ञान, मानव विद्या-भाषा, ललित कला तसेच वाणिज्य - व्यवस्थापन व कायदा अशा विविध श्रेणींनुसार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. वर्षा नाठार, डॉ. प्रणव कोल्हे, डॉ. राजेश भोयर, डॉ. जयंत वडतकर यांनी महत्त्वपूर्ण सूचना, मूल्यांकन निकष, आवश्यक डूज अँड डोन्टसवर मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.



विद्यापीठाच्या आविष्कार सेलच्या उपक्रमातून मार्गदर्शन करताना मान्यवर.

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ



अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती नुकतीच साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, साहाय्यक कुलसचिव अनिल मेश्राम, साहाय्यक कुलसचिव मिलिंद देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

वृत्त केसरी

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना समारंभपूर्वक निरोप

# कर्मचारी कुटुंबाप्रमाणे विद्यापीठ कार्यासाठी वाहून घेतात



प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती, १ जानेवारी : विद्यापीठातील कर्मचारी कुटुंबाप्रमाणे स्वतःला विद्यापीठ कार्यासाठी वाहून घेत निष्ठा व प्रामाणिकपणे काम करतात, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, सहा. कुलसचिव रविंद्र सयाम, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती उद्यान अधीक्षक अनिल घोम, सौ. घोम, मोहन डाबरे, सौ. डाबरे, श्री प्रफुल्ल ठाकरे, सौ. ठाकरे उपस्थित होते. कुलगुरू म्हणाले, विद्यापीठ हे एक कुटुंब आहे व कर्मचारी निष्ठेने आपली कामे प्रामाणिकपणे करतात. विद्यापीठाचा जो निसर्गरम्य परिसर

### कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे प्रतिपादन

झाला आहे, त्याचे श्रेय विद्यापीठाच्या उद्यान विभागाचे आहे. वृक्षारोपण, संवर्धन हे मोठे कार्य असून यासाठी उद्यान विभागाने मोठे परिश्रम घेतले आहे. कर्मचा-यांचा कामाचा असलेला उत्साह, निष्ठा ही मोठी जमेची बाजू असून, उद्यान विभागाचे अधीक्षक अनिल घोम यांना उद्यानश्री असे संबोधले तर ते वावगे होणार नाही, असेही कुलगुरू म्हणाले. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अनिल घोम, मोहन डाबरे, प्रफुल्ल ठाकरे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. तर सौ. घोम, सौ. डाबरे व सौ. ठाकरे यांचा प्रज्ञा बोंडे यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला. प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, विद्यापीठाचे कर्मचारी अतिशय नम्रपणे व प्रामाणिकपणे कामे करतात. सत्कारमूर्ती अनिल घोम, मोहन डाबरे, श्री प्रफुल्ल ठाकरे यांनी सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच सीए. पुष्कर देशपांडे, रविंद्र सयाम, शशिकांत रोडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला.

याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रा. प्रफुल्ल खराटे यांनी श्री मोहन डाबरे यांचा सपत्नीक सत्कार केला. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांना वृक्षरोपटे भेट दिले. विद्यापीठाचा परिसर आणखी हिरवागार व्हावा, म्हणून वृक्षारोपणासाठी डॉ. गवई यांनी 524 वृक्ष भेट दिले. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन भांडार विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी, तर आभार संजय ढाकुलकर यांनी मानले.

दैनिक भास्कर



## विश्वविद्यालय में हुआ कवि सम्मेलन

# मराठी भाषा विकास, विचार और परिवर्तन का माध्यम बने : डॉ.चिमोटे

**भास्कर डेस्क | अमरावती.** संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के स्नातकोत्तर मराठी विभाग एवं विदर्भ साहित्य संघ, अमरावती के संयुक्त तत्वावधान में मराठी भाषा संवर्धन पखवाड़े के अंतर्गत विद्यार्थियों का कवि सम्मेलन लिया गया, इसमें छात्रों ने एक से बढ़कर एक कविताएं प्रस्तुत कर उपस्थितों को मंत्रमुग्ध कर दिया। अध्यक्षीय संबोधन में प्रा. डॉ. मोना चिमोटे ने कहा कि मराठी भाषा को ज्ञान, सामाजिक परिवर्तन और विकास का प्रभावी माध्यम बनना चाहिए। कार्यक्रम की प्रस्तावना प्रा. डॉ. माधव पुटवाड ने की। वरिष्ठ कवि अनंत नांदुरकर, कवि नितीन भट, वरिष्ठ पत्रकार माधव पांडे तथा प्रमुख अतिथि प्रा. डॉ. हेमंत खडके ने कविता, भाषा और डिजिटल युग में साहित्य की भूमिका पर विचार व्यक्त किए।

कवि सम्मेलन में विश्वविद्यालय के विभिन्न विभागों के विद्यार्थियों ने स्वरचित कविताएँ प्रस्तुत कर सराहना प्राप्त की। कार्यक्रम का संचालन ऋषिकेश पाडर व साक्षी धुले तथा आभार प्रदर्शन प्रा. अभिजीत इंगले ने किया।

बड़ी संख्या में विद्यार्थी, शोधार्थी व प्राध्यापक उपस्थित थे। सभी ने कार्यक्रम की सराहना की।

जनमाध्यम

# कर्मचारी कुटुंबाप्रमाणे विद्यापीठ कार्यासाठी स्वतःला वाहून घेतात-डॉ.मिलींद बारहाते

**अमरावती/प्रतिनिधी**

विद्यापीठातील कर्मचारी आपल्या कुटुंबाप्रमाणे स्वतःला विद्यापीठ कार्यासाठी वाहून घेत निष्ठा व प्रामाणिकपणे काम करतात, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, सहा. कुलसचिव रविंद्र सयाम, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती उद्यान अधीक्षक अनिल घोम, घोम, मोहन डाबरे, डाबरे, प्रफुल्ल ठाकरे, ठाकरे उपस्थित होते.



प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, विद्यापीठाचे कर्मचारी अतिशय नम्रपणे व प्रामाणिकपणे कामे करतात. कर्मचाऱ्यांची उणीव भासत असली तरीही त्याचा बाऊ न करता कर्मचाऱ्यांनी सातत्याने आपल्या संस्थेशी असलेले प्रेम, निष्ठा, प्रामाणिकपणा आजही कायम आहे, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सत्कारमूर्ती अनिल घोम, मोहन डाबरे, प्रफुल्ल ठाकरे यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगताना सहकारी कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभावाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच सीए. पुष्कर देशपांडे, रविंद्र सयाम, शशिकांत रोडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्ज्वल भविष्याच्या व दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्यात. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. प्रफुल्ल खराटे यांनी श्री मोहन डाबरे यांचा सपत्नीक सत्कार केला. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई यांनी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांना वृक्षरोपटे भेट दिले. विद्यापीठाचा परिसर आणखी हिरवागार व्हावा, म्हणून वृक्षारोपणासाठी डॉ. गवई यांनी ५२४ वृक्ष भेट दिले. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन भांडार विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी, तर आभार संजय ढाकुलकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

उत्सव • विद्यापीठात ऋणानुबंध माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात; मान्यवर सहभागी

# आम्हाला घडवण्यामध्ये विद्यापीठाचे मोलाचे योगदान : डॉ. सुशील खोजरे

प्रतिनिधी | अमरावती



विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या ऋणानुबंध माजी विद्यार्थी मेळाव्यात सहभागी मान्यवर.

पश्चिम विदर्भ सारख्या मागास भागात विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाने आम्हा सर्व माजी विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाचे कार्य करुन मोठे केले. त्यामुळेच आम्ही देशातच नव्हे, तर जगातल्या नामांकित संस्थांमध्ये मोठ्या पदांवर कार्यरत असल्याचा अभिमान वाटत असल्याचे मत फिडेलिटी इन्व्हेसमेंट, नॉर्थ कॅरोलिना, अमेरिका येथील वरीष्ठ व्यवस्थापक डॉ. सुशील खोजरे यांनी व्यक्त केले. अमरावती विद्यापीठाच्या वतीने ऋणानुबंध जोपासण्यासाठी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बाराहाते, अल्युमिनी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत गावंडे, उपाध्यक्ष डॉ. स्वाती शेरेकर, माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार, यांचेसह विविध माजी विद्यार्थी उपस्थित होते.

तसेच अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते म्हणाले, सर्व माजी विद्यार्थी हे विद्यापीठाचे रत्न आहेत. सहाशेच्या वर माजी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.माजी विद्यार्थ्यांशी भावनिक व आत्मिक नाते असल्यामुळे आम्ही ऋणानुबंध ही थीम या कार्यक्रमाकरीता ठेवली. आमचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात मोठ मोठ्या पदांवर कार्यरत असल्याचा आम्हाला अभिमान आहे. सर्वच क्षेत्रात आज विद्यापीठाचे नाव आदराने घेतल्या जाते, याचा आम्हाला गौरव वाटतो. तसेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्रॅक्टिकल बेसला व ॲनॅलिटीकल ॲप्रोचला अधिक भर दिला आहे. तसेच दरवर्षी हा मेळावा आयोजित होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार यांनी मनोगत व्यक्त केले.

## विद्यापीठामुळे आम्ही घडलो : माजी विद्यार्थी

माजी विद्यार्थी शितल राठोड, संजय कराड, डॉ. प्रशांत गव्हं, प्रवीण वानखडे, डॉ. दिलीप काळे, डॉ. नीलेश मनवार, डॉ. संतोष चव्हाण हे उच्च पदांवर कार्यरत असून विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आहे. विद्यापीठामुळे आम्ही घडलो, आम्हाला दिशा मिळाली आणि म्हणूनच आम्ही आज उच्च पदावर कार्यरत असून समाजाला सेवा देत आहोत, याचा आम्हाला अभिमान वाटत असल्याची भावना या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

## कुलगुरुंच्या हस्ते माजी विद्यार्थ्यांचा गौरव

डॉ. प्रशांत गावंडे व डॉ. स्वाती शेरेकर यांनी प्रास्ताविकेतून माजी विद्यार्थी मेळाव्या मागील भूमिका विषद केली. आनंद यादव यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सन्मान सत्कार करण्यात आला. संचालन श्वेता कोटक यांनी, तर आभार अक्षय बांगर यांनी मानले. विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, विविध प्राधिकारिणींचे सदस्य, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यापीठामुळेच गुणवत्तेला चालना

डॉ. खोजरे पुढे म्हणाले की, आयोजित माजी विद्यार्थी मेळावा हा खरोखरच ऋणानुबंध आहे. १९९८ ला विद्यापीठातून एम.सी.ए. पूर्ण केल्यानंतर आम्ही पहिल्या बॅचचे पाच विद्यार्थी अमेरिकेला गेलो आणि त्याठिकाणी नोकरीला लागलो. उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने त्यांना जे ज्ञानार्जन केले, शैक्षणिकदृष्ट्या सक्षम केले, शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले, त्यामुळेच सर्व माजी विद्यार्थी यशस्वी मार्गावर पोहचू शकले. त्यांना आलेले अनुभव याठिकाणी त्यांनी सांगितले आहेत. विद्यापीठाने या निमित्ताने एक चांगले व्यासपीठ आम्हा सर्वांना उपलब्ध करुन दिले, त्याबद्दल ऋणी आहोत, असेही ते म्हणाले.

# आव्हान शिबिरात महाराष्ट्रातून अमरावती विद्यापीठ अव्वल

## उत्कृष्ट विद्यापीठ व उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित



अमरावती (प्रतिनिधी) दि. २१ [illegible]

गौरव • संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

# शिक्षणातून सामाजिक परिवर्तन शक्य; कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते प्रतिपादन

प्रतिनिधी | अमरावती



विद्यापीठात प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित असलेले मान्यवर.

शिक्षण हीच ती शक्ती आहे, जी समाजात परिवर्तन घडवू शकते. विद्यापीठ हे केवळ पदव्या देणारे केंद्र नसून जबाबदार नागरिक, संशोधक, उद्योजक आणि नेतृत्व घडवणारे एक सशक्त व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी कुलगुरू डॉ. बारहाते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजस्तंभस्थळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, राजेश चिटडी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले की, २६ जानेवारी १९५० हा दिवस भारताच्या इतिहासातील एक सुवर्णाक्षरी दिवस आहे. या दिवशी आपण स्वतःचे संविधान स्वीकारले. भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक म्हणून जगाच्या पटलावर उभा राहिला. हे संविधान केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून, ते समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय मूल्यांचे प्रतीक आहे.

गेल्या काही वर्षांत आपल्या विद्यापीठाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा, संशोधन उपक्रम, स्टार्टअप्स आणि आंतरराष्ट्रीय संधींमध्ये मिळवलेले यश हे सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. आजचा काळ हा केवळ ज्ञानाचा नाही, तर कौशल्य, नवकल्पना आणि नैतिक मूल्यांचा आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात कृत्रिम बुध्दिमत्ता, डेटा सायन्स, बायोटेक्नॉलॉजी आणि उद्योजकता क्षेत्रांत भारत जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे. या प्रवासात आपल्या विद्यापीठातील तरुणाईने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रजासत्ताक दिनाला विविध प्राधिकारिणींचे सन्माननीय सदस्य, सर्व संवैधानिक अधिकारी, विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यापीठाची उद्योजकतेचे केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल

आपले विद्यापीठ हे केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता आता इनोव्हेशन आणि उद्योजकतेचे केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे, याचा कुलगुरू म्हणून सार्थ अभिमान वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या वेळी कुलगुरूंनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# विद्यापीठ रासेयो चमूची उत्कृष्ट कामगिरी



उत्कृष्ट कामगिरी करणारी विद्यापीठाची रासेयो चमू

### राज्यस्तरीय स्पर्धेत घेतला होता भाग

अमरावती, १३ जानेवारी

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्षाद्वारा राज्यस्तरीय उत्कर्ष-सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूने उत्कृष्ट कामगिरी करीत संकल्पना नृत्य, समूहगान व उत्कृष्ट कार्य भितिचित्र अहवाल या कलाप्रकारामध्ये तीन पारितोषिके प्राप्त केली आहेत. विद्यापीठाच्या चमूने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व चमू व व्यवस्थापकांचा सत्कार केला.

सदर महोत्सव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे नुकताच पार पडला. या महोत्सवामध्ये महाराष्ट्रभरातील २२ विद्यापीठांमधून ३०४ स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

त्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय अमरावतीचा गजानन पळसकर, जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय दर्यापूरचा सार्थक गावंडे, राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जीचा अभिषेक धर्मे, सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोलाचा हर्षल गवई, कला आणि वाणिज्य महाविद्यालय वरवट बकालचा अभिषेक कातव, जिजामाता महा. बुलढाणाचा संकेत वाघडे, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महा. यवतमाळचा तुषार उके, आर. ए. कॉलेज वाशीमचा महेश राठोड व ऋषिकेश कोंढाणे, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड मॅनेजमेंट बडनेराची आर्या जामोदकर, विद्याभारती महा. अमरावतीची जान्हवी येटे, राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जीची तृप्ती खरात, आर. एल. टी. विज्ञान महाविद्यालय अकोलाची यशिका प्रांजळे, पायल भगत, विज्ञान महाविद्यालय मलकापूरची वृषाली गायकवाड, लोकमान्य टिळक महाविद्यालय वणीची ऋतुजा रामगिरवार, बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय पुसदची राजेश्वरी गजरे, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय अमरावतीची नियती काळे असे १८ स्वयंसेवक, तर चमू व्यवस्थापक म्हणून जिजामाता महाविद्यालय बुलढाणाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन लोहटे सहभागी झाले होते. सदर स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या रासेयो स्वयंसेवकांनी आठ सामाजिक व सांस्कृतिक कलाप्रकारापैकी संकल्पना नृत्य, समूहगान व उत्कृष्ट कार्य भितिचित्र अहवाल या कलाप्रकारामध्ये तीन पारितोषिके प्राप्त केली आहेत. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सर्व स्वयंसेवकांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. नीलेश कडू यांनीही सर्वांचे भरभरून कौतुक करून शुभेच्छा दिल्या. (तभा वृत्तसेवा)

तरुण भारत

# विद्यार्थ्यांनो, जास्तीत जास्त स्टार्टअप करा : कुलगुरू



स्टार्टअपची पाहणी करताना कुलगुरू बारहाते, दीपक मेनारीया व अन्य

## विद्यापीठात स्टार्टअप एक्सपोचे उद्घाटन

◆ **अमरावती, ३० जानेवारी**

आजच्या युगात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या प्रवाहाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी संशोधनाची दिशा ठरवावी आणि जास्तीत जास्त स्टार्टअप करावे. विद्यापीठातर्फे सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सीड फंड दिला जाईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी शुक्रवारी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ व विद्यापीठातील संशोधन आणि इन्क्युबेशन केंद्राच्यावतीने द्विदिवसीय स्टार्टअप एक्सपोच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर स्टार्टअप मेंटल इन्व्हेस्टर आणि थॉट लीडर दीपक मेनारीया, सेंट व्हिन्सेंट पलोट्टी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, नागपूरच्या सीएसई विभागाचे प्रमुख डॉ. मनोज ब्राह्मे, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, रिसर्च ॲण्ड इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.

दीपक मेनारीया म्हणाले, स्टार्टअप सुरू करण्यासाठी वय किंवा परीक्षेत मिळणारे गुण यांचा कोणताही संबंध नाही. अगदी सहा वर्षाच्या मुलांपासून ते ७८ वर्षाच्या वृद्धांपर्यंत कोणीही आपल्या कल्पनेने स्टार्टअप सुरू करू शकतो. कृषी, पर्यावरण, उद्योग, मेडिकल, हर्बल प्रॉडक्ट्स आणि आयुर्वेद यासारख्या वैविध्यपूर्ण क्षेत्रांमध्ये स्टार्टअपच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. संस्कृती आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणारी कल्चर टेक ही नवी संकल्पना उदयास येत असून, या क्षेत्रातही स्टार्टअपसाठी मोठा वाव आहे.

स्टार्टअप केवळ पैसा कमविण्यासाठी नसून, समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी उत्तम माध्यम आहे. स्टार्टअप करणारा विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभा राहून अनेकांना नोकऱ्या देणारा बनतो, असे ते म्हणाले.


डॉ. मनोज ब्राह्मे म्हणाले, २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्टार्टअप इंडिया योजनेमुळे देशात मोठी औद्योगिक क्रांती झाली. संत गाडगे बाबांच्या जनसेवा हीच ईश्वर सेवा या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांनी समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी स्टार्टअप सुरू करावे. आजच्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सायबर सेक्युरिटी या विषयांची गरज ओळखून या क्षेत्रातील कौशल्य विकसित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

**मार्गदर्शक**



**श्री आचार्य देवव्रत**

मा. राज्यपाल तथा कुलपती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**



**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**



**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ